



दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25






अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २०२ । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प्.) । गुरूवार २०/०८/२०२६ । पाने - ६





# अमृतवाहिनी विद्यापीठ शिखर शैक्षणिक संस्था, बाळासाहेब थोरात कुलपती



## अमृतवाहिनी विद्यापीठाचा शानदार शुभारंभ

**गुणवत्ता हे संगमनेरचे वैशिष्ट्य असून अमृतवाहिनी विद्यापीठाबरोबर संगमनेरचे नाव मोठे होणार आहे .लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते अमृतवाहिनी विद्यापीठ फलकाचे अनावरण करण्यात आले. याचबरोबर फार्मसी विभागाच्या कॉस्मेटोलॉजी या नवीन अभ्यासक्रमाचे बी टेक व एम टेक चे प्रवेश सुरू झाले आहे. अमृतवाहिनी विद्यापीठाच्या शुभारंभाने संगमनेर शहर व तालुक्याच्या शिरपेचामध्ये शैक्षणिक क्षेत्रातील मानाचा तुरा रोवला असल्याने संपूर्ण उत्तर महाराष्ट्र, संगमनेर तालुक्यामध्ये व शिक्षण क्षेत्रामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर-सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी स्थापन केलेल्या अमृतवाहिनी संस्थेची वाटचाल ही कायम गुणवत्तापूर्ण राहिली आहे. अमृवाहिनी हे केवळ विद्यापीठ नाही तर एक शिखर संस्था आहे. या संस्थेच्या विविध शाखांमधून अनेक विद्यार्थी देशात व विदेशात मोठ्या पदांवर कार्यरत आहे. जगातील बदलांबरोबर नवीन अभ्यासक्रम गरजेचे झाले असून अमृतवाहिनी विद्यापीठ हे गुणवत्तेमुळे देशातील मोठे विद्यापीठ ठरेल असा विश्वास राज्याचे मा. महसूल व शिक्षणमंत्री तथा अमृतवाहिनी विद्यापीठाचे कुलपती बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केला आहे.

अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयातील अमृत कला मंच येथे अमृतवाहिनी विद्यापीठाचा शुभारंभ सोहळा मोठ्या थाटात पार पडला. यावेळी ते बोलत होते या प्रसंगी व्यासपीठावर मा. आ. डॉ. सुधीर तांबे, ड माधवराव कानवडे, सौ. कांचनताई थोरात, सौ. दुर्गाताई तांबे, डॉ. रोहित डूबे पाटील, पांडुरंग पा. घुले, लक्ष्मणराव कुटे, रणजीतसिंह देशमुख, डॉ. जयश्रीताई थोरात, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, कार्यकारी विश्वस्त सौ. शरयूताई देशमुख, सिने अभिनेत्री इशिता शर्मा, सुधाकर जोशी, के. के. थोरात, अजय फटांगरे, उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख, विलास वर्पे, तुळशीनाथ भोर, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, व्यवस्थापक प्रा. व्ही. बी. धुमाळ, डॉ. जे. बी. गुरव यांच्यासह पदाधिकारी व प्राचार्य उपस्थित होते.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते रिमोट द्वारे अमृतवाहिनी विद्यापीठाच्या फलकाचे अनावरण व वेबसाईटचे अनावरण करण्यात आले. यावेळी बोलताना श्री. थोरात म्हणाले की, सह. म. भाऊसाहेब थोरात यांनी सहकाराबरोबर तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे याकरिता सह्याद्री बहुजन शिक्षण संस्थेची स्थापना केली. याचबरोबर विद्यार्थ्यांना उच्च, तांत्रिक शिक्षण मिळावे याकरता अमृतवाहिनी शिक्षण संस्था स्थापन केली. ४९ वर्षांच्या वाटचालीमध्ये अमृतवाहिनी संस्थेचा वटवृक्ष झाला असून गुणवत्तेमुळे देशांमध्ये लौकिक निर्माण झाला आहे. विविध शाखांमधील अनेक माजी विद्यार्थी देशात आणि विदेशावर मोठ्या पदांवर कार्यरत आहे. मागील दोन वर्षांपासून कृषी महाविद्यालय सुरू झाले असून फूड टेक्नॉलॉजी हे महाविद्यालय आता सुरू झाले आहे. राज्यभरातील पालक आपल्या मुलांच्या प्रवेशासाठी शासकीय महाविद्यालयानंतर अमृतवाहिनीला पहिले प्राधान्य देत आहे.

अमृतवाहिनी विद्यापीठामुळे जगामध्ये होणाऱ्या बदलांबरोबर विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे याकरता काम केले जाणार आहे .याकरता जगभरातील विद्यापीठांशी समन्वय केला आहे. गुणवत्ता हे वैशिष्ट कायम राहिले असून पुढील काळातही गुणवत्तेमुळे अमृतवाहिनीचा लौकिक जगभरात होणार असून हे विद्यापीठ आगामी काळात देशातील मोठे विद्यापीठ ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अमृतवाहिनीच्या नाव लौकिकामुळे मुख्यमंत्री, मंत्रिमंडळ, विधानसभा, विधानपरिषद या सर्वांनी मंजुरी दिली असून सर्व निकष पूर्ण केले आहेत. या सर्व कामांमध्ये सर्वांचे योगदानाबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त करताना येणाऱ्या पाच वर्षांमध्ये सर्व आधुनिक व अत्याधुनिक सुविधांसह हे विद्यापीठ उभे असेल. बी टेक व एम टेक चे प्रवेश सुरू झाले असून पालकांची पहिली पसंती अमृतवाहिनी विद्यापीठाला असल्याचे ते म्हणाले. (पान २)

# शेतकऱ्यांना संपूर्ण नुकसान भरपाई मिळणार- अॅड. मनकर



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - महाराष्ट्रातील बहुतेक जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे पिकाचे, घरांचे, जनावरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. काही ठिकाणी जीवितहानी सुद्धा झाली आहे. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी किसान सभेच्या वतीने राज्याचे कृषिमंत्री दत्ता भरणे यांच्याकडे केली.

कृषिमंत्र्यांनी सांगितले की संपूर्ण नुकसानीचे प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करण्याचे काम पूर्ण होत आले आहे. त्या सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना निश्चितपणे नुकसान भरपाई मिळेल. महाराष्ट्रातील एकही शेतकरी राज्य सरकार वाऱ्यावर सोडणार नाही. अशी स्पष्ट ग्वाही कृषिमंत्र्यांनी या भेटीत दिली.

महाराष्ट्र राज्य कृषी विभागाचा PMEME योजनेत देशात प्रथम क्रमांक आला आहे. भारत सरकारच्या अन्न व प्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या वतीने दिनांक २४ व २५ ऑगस्ट रोजी दिल्ली येथे कृषिमंत्री यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

# एकीकडे खतांचा काळाबाजार तर दुसरीकडे 'जनधन' मध्ये फसवणूक

## चंदनापुरीत कृषी सेवा केंद्रचालकावर गुन्हा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - रासायनिक खतांचा काळाबाजार करण्याच्या उद्देशाने अनधिकृत ठिकाणी खतसाठा करून बिल न देता विक्री केल्याचा प्रकार तालुक्यातील चंदनापुरी येथे उघडकीस आला आहे. याप्रकरणी कृषी विभागाने शिवकृपा या कृषी सेवा केंद्रावर कारवाई करत दुकानातून ३ हजार ७२४ रुपये किमतीच्या १४ युरिया गोण्या जप्त केल्या.

कृषी अधिकारी दत्तात्रय साळुंखे यांच्या फिर्यादीवरून तालुका पोलिसांनी मंगेश रहाणे ने यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केल्याची माहिती नर मंडळ कृषी अधिकारी दत्तात्रय साळुंखे यांनी दिली.

चंदनापुरी येथील शिवकृपा कृषी सेवा केंद्र ने या दुकानात युरियाची गाडी उतरवून त्याची छुप्या ना पद्धतीने विक्री केली जात असल्याची माहिती की कृषी अधिकाऱ्यांना मिळाली. उपविभागीय कृषी श्री अधिकारी अक्षय गोसावी, तंत्र अधिकारी किरण ना विरकर व गुण नियंत्रण अधिकारी ओमकार यन्नम ी. यांच्या पथकाने घटनास्थळी पाहणी केली असता नी काही शेतकरी युरिया खताच्या बॅगा घेऊन जात. असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले. तर दुकानासमोर एका शेतकऱ्याकडे आर. सी. एफ. कंपनीच्या युरियाच्या दोन बॅगा आढळून आल्या. चौकशी केली असता त्याने सदर खत शिवकृपा कृषी सेवा केंद्रातून खरेदी केल्याचे सांगितले. बिल मागितले असता दुकानदाराने बिल दिले नसल्याचे त्या शेतकऱ्याने सांगितले.

पथकाने दुकानमालक मंगेश रहाणे यास बोलावून दुकान उघडून तपासणी केली असता दुकानात रासायनिक खतांच्या विक्रीची अधिकृत बिले न देणे, बिलांच्या नोंदी व्यवस्थित न ठेवणे आणि पॉस मशीनवर (पान २ वर)




## नांदुरी दुमाला ग्राहक सेवा केंद्रचालकावर गुन्हा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मुरलीधर साबळे यांच्या जनधन खात्यातील ३० हजार रुपयांची रक्कम दुसऱ्या बँकेच्या खात्यात वर्ग करण्याच्या नावाखाली स्टेट बँकेच्या ग्राहक सेवा केंद्रचालकाने रक्कम स्वतःच्या बँक खात्यावर वर्ग केली. चौकशीनंतर फसवणूक झाल्याचे उघड होताच संगमनेर तालुका पोलिसात दिलेल्या फिर्यादीवरून ग्राहक सेवा केंद्रचालक गणेश लक्ष्मण दुधवडे याच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

नांदुरी दुमाला येथील मुरलीधर साबळे यांचे स्टेट बँक ऑफ इंडिया, संगमनेर येथे खाते आहे. त्यांच्या जनधन खात्यावर २२ सप्टेंबर २०२३ रोजी ८ लाख रुपये जमा झाले होते. एवढी मोठी रक्कम जनधन खात्यात ठेवता येत नाही, असे सांगून ग्राहक सेवा केंद्र चालक गणेश दुधवडे यांनी साबळे यांना फोन केला. ही रक्कम तुम्हाला तुमच्या अॅक्सिस बँकेच्या खात्यावर वर्ग करावी लागेल, असे सांगितले. साबळे यांनी दुधवडे याच्यावर

विश्वास ठेवला. सुट्टीच्या दिवशी दुधवडे हा साबळे यांच्या घरी गेला आणि त्यांच्या डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा घेऊन एक रुपया त्यांच्या अॅक्सिस बँक खात्यावरती वर्ग केल्याचे दाखविले आणि उर्वरित रक्कम नंतर वर्ग करतो, असे सांगून तो निघून गेला. मात्र त्यानंतर साबळे यांच्या मोबाईलवर आलेल्या बँक व्यवहाराच्या माहितीत ६० हजार रुपये अपेक्षित खात्यावर वर्ग न होता त्यापैकी ३० हजार रुपये गणेश दुधवडे यांच्या वैयक्तिक खात्यावर, तर उर्वरित ३० हजार रुपये दुधवडे याच्या फिया टेक्नॉलॉजी या खात्यावर असे एकूण ६० हजार रुपये जमा झाले जमा झाले. साबळे यांच्या निदर्शनास (पान २ वर)














# छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक २२०० चौ.फु. जागेतच उभारावे

## वाढीव जागेच्या मंजुरीपर्यंत पुतळा उभारणीची नगरपालिकेने घाई करू नये



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक भव्यदिव्य स्वरूपात उभारण्यात यावे, यासाठी आमदार अमोल खताळ यांच्या नेतृत्वाखाली शिवप्रेमी नागरिक, महायुती पदाधिकारी आणि विविध हिंदुत्ववादी संघटनांनी पुढाकार घेतला आहे. सध्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने संगमनेर बसस्थानक परिसरात स्मारकासाठी ४ मीटर ÷ ६ मीटर जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला असला, तरी एवढ्या मर्यादित जागेत स्मारक उभारण्याऐवजी किमान २२०० चौरस फूट जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. वाढीव जागेचा निर्णय होत नाही, तोपर्यंत अश्वारूढ पुतळा उभारण्याची नगरपालिका प्रशासनाने घाई करू नये, अशी मागणी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे नगर परिषद प्रशासनाला केली आहे.

संगमनेर शहराच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरेला साजेसे छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारावे, ही शिवप्रेमी नागरिक आणि हिंदुत्ववादी संघटनांची अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. या मागणीसाठी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आणि आमदार अमोल खताळ यांनी तत्कालीन मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तसेच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे.

या पाठपुराव्यानंतर राज्य परिवहन महामंडळाने संगमनेर बसस्थानक परिसरामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकासाठी ४ मीटर ÷ ६ मीटर जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. मात्र, एवढ्या कमी जागेत स्मारक उभारणे योग्य होणार नसून, स्मारक भव्य स्वरूपात उभारण्यासाठी २२०० चौरस फूट जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी २२ जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडे केली आहे.

**छत्रपती शिवाजी महाराज स्मारक जागेचा प्रश्न हा कोणत्या ही राजकीय पक्षाच्या श्रेयाचा विषय नाही. संगमनेर तालुक्याला असलेला ऐतिहासिक वारसा संस्कृती परंपरा संस्कृती परंपरा याला साजेशी असे स्मारक असे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वैभवाला साजेसे स्मारक उभारले जावे अशी महायुती तसेच सर्व हिंदुत्ववादी संघटना व शिवप्रेमींची भावना आहे.**

वाढीव जागेच्या मागणीसाठी आ. खताळ यांचा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असून, प्रशासकीय स्तरावर लवकरच सकारात्मक निर्णय होईल, असा आशावाद महायुतीचे ज्ञानेश्वर कर्पे, शिरीष मुळे, प्रकाश राठी, रामभाऊ जाजू, भाजप शहराध्यक्ष पायल ताजणे, शिवसेना शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी यांनी व्यक्त केला.

यावेळी आरपीआय शहराध्यक्ष कैलास कासार, युवासेना उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख, भाऊ जाखडी, अंकुश केसेकर, नामदेव गुंजाळ, दिलीप रावळ, भारत गवळी, राजेंद्र सांगळे, दिनेश सोमाणी, दीपेश ताटकर, रवी म्हस्के, अभिजीत पुंड, शशांक नामन, योगेश सूर्यवंशी, पूनम दायमा, रेखा गलांडे, संगीता पुंड, सपना जाधव, शिवज्ञा आरगडे, आरती पगारे, सुशील शेवाळे, सार्थक शेवाळे, वरद बागुल, मनोज जुंदरे यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरून -

### अमृतवाहिनी विद्यापीठ शिखर शैक्षणिक ...

मा. आ. डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्यानंतर लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी या विभागाला नेतृत्व दिले. सहकार, शिक्षण, कृषी या सर्व क्षेत्रांमध्ये आज संगमनेर तालुका अग्रगण्य बनवला. अमृतवाहिनी विद्यापीठ हा संस्थेच्या इतिहासातील सुवर्णक्षण असून स्व. वसंतदादा पाटील यांच्या विनाअनुदानित महाविद्यालय देण्याच्या निर्णयाने महाराष्ट्रात शैक्षणिक व सामाजिक क्रांती झाली. सौ. शरयूताई देशमुख व त्यांच्या सर्व टीमने सांघिक प्रयत्न केले असून हा आनंदाचा क्षण आहे. याचबरोबर ज्ञानाचे क्षेत्र आता ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अधिक व्यापक ठरणार असल्याचे ते म्हणाले.

तर डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, अमृतवाहिनीच्या आणि संगमनेरच्या इतिहासातील आनंदाचा क्षण आहे. तीर्थरूप सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी उभे केलेले शिक्षणाची हे विश्व आता मोठे वटवृक्ष होत आहे. अमृतवाहिनीने गुणवत्ता जपली असून प्रत्येक माणूस आयुष्यभर विद्यार्थी असून काहीतरी शिकत असतो. हे विद्यापीठ नक्कीच संशोधन व नवनिर्मितीसाठी मोठे केंद्र ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तर डॉ. रोहित दुबे पाटील म्हणाले की, विद्यापीठाच्या मान्यता व वाटचालीमध्ये सर्व सहकाऱ्यांचे मोठे योगदान राहिले. या कार्यक्रमात डॉ. निंबाळकर यांनी विद्यापीठाविषयी माहिती दिली. प्रास्ताविक कार्यकारी विश्वस्त सौ. शरयूताई देशमुख यांनी केले. तर व्यवस्थापक प्रा. व्हि. बी. धुमाळ यांनी आभार मानले. यावेळी अमृत उद्योग समूहातील विविध संस्थांचे पदाधिकारी, सहकार शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते सर्व विभागांचे प्राचार्य शिक्षक विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चंदनापुरीत कृषी सेवा केंद्रचालकावर...

युरिया खताच्या साठ्याची नोंद नसणे, अशा गंभीर त्रुटी आढळून आल्या. दरम्यान, दुकानाशेजारी असलेल्या गाळ्याबाबत रहाणे यांच्याकडे विचारणा केली असता सदर गाळा त्यांच्या खतविक्रीच्या परवान्यात समाविष्ट नसल्याचे निदर्शनास आले. तो गाळा उघडला असता त्यात अनधिकृतपणे साठवून ठेवलेला युरियाचा साठा आढळून आला. ते खत आपलेच असल्याचे दुकानदाराने मान्य केले. दुकानाचा परवाना निलंबित करण्यासाठी प्रस्ताव वरिष्ठांना पाठविल्याची माहिती तालुका कृषि अधिकारी रेजा बोडके यांनी दिली.

### नांदुरी दुमाला ग्राहक सेवा केंद्रचालकावर...

आल्यानंतर फसवणूक झाल्याचे सांगत पोलिसांत तक्रार करण्याचा इशारा दिला. त्यानंतर दुधवडे यांनी साबळे यांच्या खात्यावर ६० हजार रुपये परत वर्ग केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकाराने आपली तसेच इतर खातेदारांची ही फसवणूक झाल्याचा संशय असल्याचे साबळे यांनी पोलिसांना दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

# आदर्श शिक्षक सोमनाथ कळसकर गुरुजी प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे तसेच राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त आदर्श शिक्षक सोमनाथ तात्याबा कळसकर गुरुजी यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन त्यांच्या चाहत्यांनी स्थापन केलेल्या आदर्श शिक्षक सोमनाथ कळसकर गुरुजी प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजी संगमनेर येथे उत्साहात पार पडली.

सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे मार्गदर्शक व कार्याध्यक्ष प्राचार्य ज्ञानेश्वर गोंटे सर होते. सचिव मितेश जोंधळे यांनी उपस्थितांना संस्थेच्या कार्याची दिशा, उद्दिष्टे आणि आगामी उपक्रमांबाबत मार्गदर्शन केले.

संस्थेचे संचालक अशोकराव नवले सर यांनी सभेच्या अजेंड्यानुसार विविध विषयांचे वाचन करून संस्थेच्या कार्याची माहिती दिली. उपस्थित सदस्यांनी सर्व विषयांना एकमताने मंजुरी दिली. यावेळी संस्थेच्या विश्वस्त मंडळामध्ये अध्यक्षपदासाठी रामनाथ कळसकर यांचे नाव सुचविण्यात आले. या प्रस्तावास किसन भाऊ हासे यांनी अनुमोदन दिले. तसेच संस्थेच्या सहसचिवपदासाठी योगिता कळसकर यांचे नाव श्री. गणेशलाल बाहेती यांनी सुचविले. या प्रस्तावास श्री. जोंधळे यांनी अनुमोदन दिले.

राज्यात शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शाळा व शिक्षकांचा गौरव करण्यासाठी प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणाऱ्या राज्य आदर्श पुरस्कारांच्या रकमेत वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय यावेळी घेण्यात आला. तसेच संस्थेच्या आगामी विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांची माहिती सभेत देण्यात आली.

संस्थेच्या विश्वस्त मंडळाची अधिकृत नोंद अहिल्यानगर येथील धर्मादाय उपआयुक्त कार्यालयात करण्याची जबाबदारी निश्चित करण्यात आली. पुढील वर्षभरातील विविध कार्यक्रम व उपक्रमांचे नियोजनही यावेळी करण्यात आले. सभेस संस्थेचे लिगल सल्लागार ॲड. संग्राम जोंधळे, ॲड. रंजना गवांदे, संगमनेर ज्येष्ठ नागरिक महासंघाचे पदाधिकारी गणेशलाल बाहेती, सुरेश जाजू किसन भाऊ हासे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, दीपक थेटे, दीपक घाडगे, सुशीला किसन हासे, अमोल वैद्य सदस्य व हितचिंतक उपस्थित होते.

# पोदार स्कूलला फी परत करण्याचे निर्देश

संगमनेर (प्रतिनिधी) : पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने शाळेत जाण्यास नकार दिल्यानंतर पालकांना भरलेली फी परत मिळावी, यासाठी केलेल्या तक्रारीची पंचायत समितीच्या शिक्षण विभागाने दखल घेतली आहे. पालक योगेश मनोहर सूर्यवंशी यांनी भरलेल्या २४,६९० पैकी शाळेने १६ हजार परत केले असून, उर्वरित ८,६९० परत करण्याचे निर्देश गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब एच. गुंड यांनी शाळेला दिले आहेत. याबाबत १७ ऑगस्ट रोजी शाळेला पत्र देण्यात आले असून, फी परत करून त्याबाबतचा लेखी अहवाल दोन दिवसांत सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.


**शिक्षण प्रसारक संस्था** (र.जि.नं. F-41/1961)
02425-223181 घुलेवाडी-४२२६०५, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर

**साहित्य विक्रीसाठी सीलबंद दरपत्रके मागविण्याबाबत**

शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर द्वारा संचलित विविध महाविद्यालये, वसतिगृहे व इतर विभागांमध्ये उपलब्ध असलेले रद्दी व भंगार जसे आहे, जेथे आहे, तसे (As Is Where Is Basis) या तत्त्वावर विक्री करण्यासाठी अनुभवी, नोंदणीकृत व इच्छुक खरेदीदारांकडून सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

रद्दी साहित्यामध्ये समाविष्ट वस्तू : लोखंडी साहित्य (Iron Scrap), M.S. स्टील साहित्य (Steel Scrap), ॲल्युमिनियम साहित्य, व इतर धातूंचे साहित्य, प्लास्टिक साहित्य, विद्युत व इलेक्ट्रॉनिक साहित्य, जुने लाकडी फर्निचर (टेबल, बाक, खुर्च्या इ.) फर्निचर व इतर विविध प्रकारचे साहित्य.

**अटी व शर्ती:**

1. इच्छुकांनी संस्थेच्या कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत संस्थेच्या कार्यालयाशी संपर्क साधून सदर भंगार मालाची प्रत्यक्ष पाहणी करावी.
2. संस्थेकडे उपलब्ध असलेल्या सर्व प्रकारच्या सदर भंगार मालाची विक्री एकत्रित स्वरूपात करण्यात येणार असून, इच्छुक दरपत्रकदारांनी एकरकमी (Lump Sum) दर नमूद करावा. स्वतंत्र वस्तूनिहाय दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.
3. कोणतेही किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा, नाकारण्याचा किंवा प्रक्रिया रद्द करण्याचा संपूर्ण अधिकार संस्थेला राहील.

निविदा फॉर्म व अतिरिक्त माहितीसाठी आवार व्यवस्थापक श्री.बाबासाहेब घोटेकर (मो. क्र. 9822403696) यांच्याशी संपर्क साधावा.

**दिनांक : 19.08.2026**

**सचिव,**
शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर



HAPPY Birthday
दैनिक युवावार्ता



मा. श्री. शाम कर्पे
संचालक, कृष्णा रियल इस्टेट, संगममनेर

श्री.आनंद बनभेरू
उपाध्यक्ष, संगमनेर युथ फाऊंडेशन


# पती-पत्नीमधील लैंगिक असमाधानाचा वैवाहिक नात्यावर मोठा परिणाम - डॉ. अभय मुथा



युवावार्ता (प्रतिनिधी)

टेंभुर्णी, जि. सोलापूर - : होमिओपॅथी क्षेत्रातील डॉक्टरांनी आजपर्यंत केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यासाठी रविवार, दि. १६ ऑगस्ट रोजी टेंभुर्णी, जिल्हा सोलापूर येथे 'मेगा होमिओकॉन २०२६' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास सोलापूर , अहिल्यानगर , पुणे आणि कोल्हापूर जिल्ह्यातील २५० हून अधिक वरिष्ठ होमिओपॅथिक डॉक्टर तसेच विविध होमियोपॅथिक मेडिकल कॉलेज मधील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात अहिल्यानगर येथील सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिकचे संचालक आणि सुप्रसिद्ध होमिओपॅथिक व मनोलैंगिक विकार तज डॉ. अभय मुथा यांचे "Scope of Homoeopathy in Sexology' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

सुमारे दीड तास चाललेल्या या व्याख्यानात डॉ. मुथा यांनी आधुनिक जीवनशैलीच्या पार्श्वभूमीवर वाढत असलेल्या विविध लैंगिक समस्यांवर सविस्तर भाष्य केले. तरुणांमध्ये लैंगिक आरोग्याविषयी असलेले गैरसमज, हस्तमैथुनाबाबतच्या चुकीच्या समजुती, लैंगिक कार्यक्षमतेशी संबंधित समस्या, स्त्री-पुरुषांमधील विविध लैंगिक अडचणी तसेच वैवाहिक जीवनावर त्यांचा होणारा परिणाम याबाबत त्यांनी शास्त्रीय दृष्टिकोन मांडला.

वैवाहिक नात्यातील लैंगिक समाधान हे पती-पत्नीमधील भावनिक व मानसिक स्वास्थ्याशीही जोडलेले असून, लैंगिक असमाधानाचा वैवाहिक संघर्ष आणि नातेसंबंधांवर लक्षणीय परिणाम होतो. असे डॉ. मुथा यांनी स्पष्ट केले. वाढत्या घटस्फोटांच्या पार्श्वभूमीवर लैंगिक आरोग्याविषयी खुलेपणाने संवाद साधणे , समस्यांकडे दुर्लक्ष न करणे आणि आवश्यकतेनुसार तज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच विवाहपूर्व आरोग्य तपासणी आणि समुपदेशनाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

तसेचगाडी चालवण्यासाठी जसे लायसन्स अनिवार्य आहे तसेच लग्न करण्यासाठी सरकारने मुला - मुलींना Marriage Eligibility Certificate असणे अनिवार्य करावे. म्हणजे विवाहानंतर उद्भवणाऱ्या घटस्फोटा सारख्या सामाजिक समस्या वर मोठ्या प्रमाणात आळा बसेल. असे स्पष्ट मत त्यांनी मांडले. विवाहानंतर लैंगिक समस्या उद्भवल्यास पती-पत्नीने एकमेकांवर दोषारोप करण्याऐवजी समस्येचे मूळ कारण समजून घेऊन योग्य वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे. अशा समस्यांकडे दुर्लक्ष केल्याने मानसिक तणाव, वैवाहिक संघर्ष आणि नात्यातील दुरावा वाढू शकतो, असे त्यांनी सांगितले.

डॉ. मुथा यांनी आपल्या तीन दशकांच्या वैद्यकीय अनुभवातील विविध उदाहरणांच्या माध्यमातून लैंगिक विकारांकडे केवळ शारीरिक समस्या म्हणून न पाहता त्यामागील मानसिक, भावनिक, जीवनशैलीशी संबंधित आणि वैद्यकीय कारणांचा विचार करण्याची गरज स्पष्ट केली. या प्रसंगी गेल्या ३० वर्षांपासून होमिओपॅथीच्या माध्यमातून केलेल्या त्यांच्या वैद्यकीय व सामाजिक कार्याबद्दल महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सेस , नाशिकचे सिनेट मेंबर तसेच बीड येथील होमियोपॅथिक मेडिकल कॉलेजचे प्राचार्य

श्री. डॉ. अरुण भस्मे यांच्या हस्ते डॉ. अभय मुथा यांचा सन्मानचिन्ह देऊन विशेष गौरव करण्यात आला. कार्यक्रमास उपस्थित डॉक्टर व विद्यार्थ्यांनी डॉ. मुथा यांच्या व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. लैंगिक आरोग्यासारख्या संवेदनशील विषयावर वैद्यकीय दृष्टिकोनातून खुलेपणाने चर्चा घडवून आणल्याबद्दल त्यांच्या व्याख्यानाचे उपस्थितांनी कौतुक केले. सदर मेगा होमिओकॉन २०२६ हा कार्यक्रम घडवून आणण्यासाठी महाराष्ट्र होमिओपॅथिक कौन्सिलचे उपाध्यक्ष डॉ. बाळकृष्ण गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.


**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग अहिल्यानगर**
**ई-निविदा सुचना क्रं. ०७ सन २०२६-२७**
**दुरध्वनी क्रमांक -०२४१/२३२५३३४ फॅक्स नं.०२४१/२३२५०८६**
**मुख्य संकेतस्थळ** – https://mahatenders.gov.in
e-mail- ahmednagar.ee@mahapwd.gov.in

**संक्षिप्त ई-निविदा सुचना**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अहिल्यानगर (दूरध्वनी क्रमांक ०२४१/२३२५३३४/२३२५०८६) हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ता. श्रीगोंदा, कर्जत व अ. नगर जि. अहिल्यानगर येथील एकुण ०८ कामासाठी ब-१ नमुन्यातील मोहरबंद निविदा, ई-निविदा,प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, अहिल्यानगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रु. लक्ष) | अंदाजित रक्कम (अक्षरी) |
|---|---|---|---|
| १ | श्रीगोंदा नगरपरीषद जि. अहिल्यानगर हद्दीतील गट नं.१२३७ मध्ये तालुका क्रीडा संकुलनासाठी क्रीडांगण विकसित करणे. | रु. ८०.०० लक्ष | रु. ऐंशी लक्ष मात्र |
| २ | मौजे लिंपणगांव ता. श्रीगोंदा येथील सिध्देश्वर तलाव सुशोभिकरण करणे. जि.अ.नगर | रु. ८०.०० लक्ष | रु. ऐंशी लक्ष मात्र |
| ३ | मौजे लिपणगांव ता.श्रीगोंदा येथे विठठल रुक्मिणी मंदिरासमोर ग्रा.पं. मालकीच्या मिळकत क्रं.६/३ या जागेवर सभामंडप बांधणे.जि. अहिल्यानगर | रु. १३.०० लक्ष | रु.तेरा लक्ष मात्र |
| ४ | जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय अहिल्यानगर येथील मिनी हॉल व मोठ्या हॉल समोरील आवारात पेव्हिंग ब्लॉक बसविणे. ता. जि. अहिल्यानगर | रु. २६.०० लक्ष | रु. सव्वीस लक्ष मात्र |
| ५ | मौजे वांगदरी, मासाळवाडी ता. श्रीगोंदा येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिरासमोर ग्रा.पं. मालकीच्या मिळकत क्रं.१२९४ या जागेवर सामाजिक सभागृह बांधणे. जि. अहिल्यानगर | रु. १०.०० लक्ष | रु. दहा लक्ष मात्र |
| ६ | मौजे टाकळी लोणार ता. श्रीगोंदा येथे विठठल रुक्मिणी मंदिरासमोर ग्रा.पं. मालकीच्या मिळकत क्रं. १९९/१ या जागेवर पत्राशेडचे बांधकाम करणे. जि. अहिल्यानगर | रु. १३.०० लक्ष | रु.तेरा लक्ष मात्र |
| ७ | मौजे कापरेवाडी, ता. कर्जत, येथे विठ्ठल रुक्मीणी मंदिरासमोरील ग्रामपंचायत मालमत्ता क्र. २१२ मध्ये मोकळया जागेवर सभामंडप बांधणे. | रु. १०.०० लक्ष | रु. दहा लक्ष मात्र |
| | ई-निविदा विक्री कालावधी दि. १९/०८/२०२६ ते २७/०८/२०२६, १८.०० वा. पर्यंत, निविदा उघडणे दि.२८/०८/२०२६, संध्या. १८.०० वा., | | |

**सविस्तर निविदा विक्री कालावधी दि. १९/०८/२०२६ ते २७/०८/२०२६, १८.०० वा. पर्यंत संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.**

1.www.mahapwd.com.
2. https://mahatenders.gov.in

**सदर – निविदा सुचनेमध्ये काही बदल झाल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल**

**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**अहिल्यानगर**

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चा 'फ्लाय कनेक्ट' कार्यक्रम उत्साहात

## नवीन रोटेरियनांना 'आपण एकत्र येऊन काम करूया'चा संदेश



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ चे जिल्हा प्रमुख रोटेरियन जयेश आर. पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सह जिल्हा प्रमुखांच्या व्यवस्थापनाखाली 'फ्लाय कनेक्ट - नवीन सदस्य अभिमुखता' हा विशेष कार्यक्रम रोटरी क्लब ऑफ संगमनेर यांच्या यजमानपदाखाली उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी सह जिल्हा प्रमुख रोटेरियन भागनाथ काकडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासमवेत सह जिल्हा प्रमुख रोटेरियन आनंद हासे उपस्थित होते. यजमान मंडळाच्या वतीने रोटेरियन समीर शाह (अध्यक्ष), रोटेरियन संकेत काजळे (सचिव), रोटेरियन मोहित मंडलिक (खजिनदार), ज्येष्ठ रोटेरियन दिलीप मालपाणी, रोटेरियन सुनील कडलग तसेच सदस्य उपस्थित होते.

ऑगस्ट महिना रोटरीमध्ये 'सदस्यत्व महिना' म्हणून साजरा केला जातो. 'रोटरी कुटुंबात स्वागत, आपण एकत्र उडू... चिरस्थायी प्रभाव निर्माण करू!' या संकल्पनेसह अकोले सेंट्रल, संगमनेर, शिर्डी, श्रीरामपूर आणि कोपरगाव येथून आलेल्या नवीन सदस्यांचे कार्यक्रमात स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात रोपट्याला पाणी घालून करण्यात आली. त्यानंतर रोटरीच्या 'चार मार्ग कसोटी'ने कार्यक्रमाला सुरुवात झाली. ज्येष्ठ रोटेरियन अजित काकडे यांनी 'चार मार्ग कसोटी'चे महत्त्व विशद केले.

सह जिल्हा प्रमुख रोटेरियन आनंद हासे यांनी 'रोटरीच का आणि रोटरीचे कार्य' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी रोटरीची ध्येयधोरणे आणि कार्यपद्धतीची माहिती दिली. ज्येष्ठ रोटेरियन दिलीप मालपाणी यांनी 'द रोटरी फाउंडेशन'च्या कार्याची माहिती देत 'जगात चांगले कार्य करणे' या उद्देशावर प्रकाश टाकला.

रोटरी क्लब ऑफ संगमनेरचे अध्यक्ष समीर शाह यांनी डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या 'फ्लाय ३१३२' दृष्टिकोनाची माहिती दिली. जिल्ह्यातील प्रमुख प्रकल्प, आर-सेतू प आणि जिल्हास्तरीय संधी याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. आनंद हासे यांनी सार्वजनिक प्रतिमा, डिजिटल उपस्थिती आणि सदस्यवाढीचे महत्त्व स्पष्ट केले. रोटेरियन सुनील कडलग यांनी त्यांचा रोटरी प्रवास आणि नेतृत्वाचा अनुभव उपस्थितांसमोर मांडला.

यावेळी नवीन सदस्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप सह जिल्हा प्रमुखांच्या हस्ते रोटरी प्रतिज्ञा आणि गट छायाचित्राने करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष समीर शाह, संयोजक संकेत काजळे, सहसंयोजक मोहित मंडलिक, महेश ढोले आणि राजेंद्र खोशे यांनी नियोजन केले. शिर्डी, कोपरगाव, अकोले, शेवगाव आणि श्रीरामपूर येथील नवीन रोटरी सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विकास करंजेकर आणि डॉ. रमेश पावसे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता आनंदी वातावरणात विविध मनोरंजनात्मक उपक्रम, संगीत खुर्ची आणि स्नेहभोजनाने झाली.

# विद्यार्थ्यांनो जीवनात उत्तुंग ध्येय निवडा

## पोलीस हवालदार एकनाथ खाडे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचलित श्री बाळेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सारोळे पठार येथे पोलीस दलात हवालदार पदावर कार्यरत असलेले एकनाथ खाडे यांनी आपल्या मुलांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे अनोखे गिफ्ट देत इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी एनएमएमएस (राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती) परीक्षेच्या पुस्तकांचे २० संच भेट दिले.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना एकनाथ खाडे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी जीवनात उत्तुंग ध्येय निश्चित करून ते साध्य करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत. एनएमएमएस ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी केंद्र सरकारतर्फे घेण्यात येणारी महत्त्वाची शिष्यवृत्ती परीक्षा आहे. या परीक्षेत यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांना इयत्ता नववी ते बारावीपर्यंत दरमहा एक हजार रुपये, म्हणजेच प्रतिवर्षी १२ हजार रुपये आणि चार वर्षांत एकूण ४८ हजार रुपयांची आर्थिक मदत मिळते.

स्पर्धा परीक्षांचे विद्यार्थ्यांच्या भविष्यातील करिअरमध्ये मोठे महत्त्व असल्याचे सांगत खाडे यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाचे योग्य नियोजन करण्याचा सल्ला दिला. अभ्यासासाठी वेळापत्रक तयार करा, शांत जागेची निवड करा, मोबाईलपासून दूर राहा, वाचनातून स्वतःच्या नोट्स तयार करा आणि शिकलेल्या अभ्यासक्रमाची वारंवार उजळणी करा. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी वाढदिवसानिमित्त पुस्तकांचे वाटप करण्याचा खाडे यांचा उपक्रम उपस्थितांनी कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमास श्री. ढोकरे, श्री. कोकाटे, घोडे, विद्यालयाचे प्राचार्य उत्तम खांडवी, मधुकर बांबळे, शभाऊराव धोंगडे, विकास सोनवणे, श्रीरंग गोडे, श्वेतन सरोदे, संजय ठोकळ, रघुनाथ मेंगाळ, विश्वास पोखरकर, विठ्ठल फटांगरे, गंगाधर पोखरकर, मंगेश औटी यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

HAPPY Birthday
दैनिक युवावार्ता



मा. श्री. पद्माकरजी मतकर
मॅनेजर, बलराम नागरी सह. पतसंस्था



मा. श्री. शाहाजी काळे
फोटोग्राफर

# ८० मिनिट नॉन-स्टॉप स्केटिंग मॅरेथॉनचा विश्वविक्रम; ६२ विद्यार्थ्यांचा सहभाग

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भारताच्या ८०व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून अंबिशन स्पोर्ट्स अँड कल्चरल फाउंडेशन, संगमनेर यांच्या वतीने ८० मिनिटांची नॉन-स्टॉप स्केटिंग मॅरेथॉन हा अभिनव विश्वविक्रमाचा उपक्रम संगमनेर क्रीडा संकुल येथे उत्साहात आयोजित करण्यात आला. या उपक्रमाला विद्यार्थी, पालक तसेच क्रीडाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.


या विश्वविक्रमाच्या प्रयत्नात संगमनेर तालुक्यासह अकोले, कोपरगाव, राहाता, अहिल्यानगर आदी विविध तालुक्यांतील शाळांमधून एकूण ६२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सहभागी विद्यार्थ्यांनी सलग ८० मिनिटे न थांबता स्केटिंग करून आपली क्रीडा क्षमता, शारीरिक तंदुरुस्ती आणि चिकाटीचे दर्शन घडविले. विद्यार्थ्यांच्या या उत्साहामुळे संपूर्ण क्रीडा संकुलात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

अंबिशन स्पोर्ट्स अँड कल्चरल फाउंडेशनचे अध्यक्ष ज्ञानेश्वर भोत आणि सचिव प्रशांत भंडारी यांच्या संकल्पनेतून तसेच नियोजनातून या अभिनव



उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना क्रीडाक्षेत्राकडे आकर्षित करण्याबरोबरच त्यांच्यामध्ये शिस्त, सातत्य आणि आत्मविश्वास निर्माण व्हावा, हा या उपक्रमामागील उद्देश होता. कार्यक्रमाची सुरुवात राजेंद्र विनायक नलावडे यांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी स्केटिंग मॅरेथॉनला सुरुवात केली. निर्धारित ८० मिनिटांच्या कालावधीत विद्यार्थ्यांनी न थांबता स्केटिंग करत आव्हान पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले. प्रशिक्षक आणि आयोजकांनी विद्यार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी संगमनेरचे कला भूषण व पद्मश्री पुरस्कार विजेते रघुवीर खेडकर तसेच संगमनेरच्या नगराध्यक्षा मैथिली तांबे यांच्या हस्ते सहभागी सर्व विद्यार्थ्यांना मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# आखुडशिंगी प्रत्ययकारी आश्वासक कथासंग्रह



अशोक शेटे हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील एक कल्पक, उपक्रमशील शिक्षक, मुक्त पत्रकार, कवी व स्तंभ लेखक म्हणून अनेकांना परिचित आहेत. अनेक सामाजिक चळवळीत ते सक्रिय सहभागी असतात. नुकताच त्यांचा चपराक प्रकाशनाकडून 'अनुभवाचे अंतरंग' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला आहे. या कथासंग्रहातील सर्वच कथा लांबीने छोट्या पण आशयाने मोठ्या आहेत. थोडक्यात 'घागर में सागर' या प्रकारात त्या मोडणाऱ्या आहेत.

'उपक्रमांचा किडा' ही कथा आजच्या काळातली आहे. फेसबुक, फ्रेंड रिक्वेस्ट, मेसेंजर, चॅटिंग यांसारख्या विषयांभोवती फिरता फिरता नकळत कथाविषयाला वेगळीच कलाटणी मिळते. वाचक शेवटपर्यंत कथेत गुंतून राहतो. 'माझ्या लग्नाची गोष्ट' ही कथा एका शिक्षण सेवकाच्या सुरुवातीच्या आयुष्याची जणू चित्तरकथाच सांगून जाते. परिस्थितीचे टक्केटोणपे खात, धडपडत, मार्ग काढत, काटकसरीतून, तडजोडीतून सुंदर आयुष्य उभे राहू शकते, जीवनाचे हे मर्म ही कथा अगदी सहजगत्या सांगून जाते. 'न हरवलेली सुमन' ही कथा न हरवलेली सुमन कशी सापडली? यातून गोडेगावाला एक अख्खी रात्र खळखळून हसायला कोणतं कारण मिळालं? यांसारख्या प्रश्नांची मजेशीर उत्तर देते.

'लग्न मंडपातील रेडिओची गोष्ट' ही कथा रेडिओवरचं गाणं ऐकता ऐकता ते गाणं जसं मनात रेंगाळत राहतं. तशीच ही कथाही मनात रेंगाळत राहते. ही कथा जरी साधी सोपी असली तरी तिला अंतरिक ओघवतेपण आहे. लेखक कथेला शेवटाकडे नेताना सुंदर म्हणीची पेरणी करतो. 'रेडिओ बंद झाला तरी चालेल, संसार सुरूच राहिला पाहिजे', या म्हणीचा अर्थ उलगडणारी ही कथा मनात अगदी घट्ट फिट्ट बसून राहते. आणि नकळत ओठांवर हसूही फुलवते.

'छडीपलीकडचा धडा' ही कथा प्रत्येक शिक्षकाला अंतर्मुख करणारी आहे. विद्यार्थी हा प्रेमळच असतो, फक्त त्याला आपण समजून घेतलं पाहिजे. खरंतर, शाळेत विद्यार्थी जसा घडत जातो तसाच विद्यार्थ्यांच्या सहवासात शिक्षकही नकळत घडत असतो हेच सांगणारी प्रेरक कथा प्रत्येक शिक्षकाने वाचलीच पाहिजे.

'पासपोर्ट' ही कथा रोहित नावाच्या एका शिक्षकाची. परदेशातील शिक्षण पद्धती अभ्यासण्यासाठी शिक्षकांना संधी मिळणार होती.जर आपल्याला परदेशात जायचे असेल, या संधीचा लाभ घ्यायचा असेल तर आपल्याकडे पासपोर्ट हवा म्हणून आपण आधी पासपोर्ट काढून ठेवूया म्हणून त्या शिक्षकाची धडपड सुरू होते. इतकी ही साधी गोष्ट. पण त्या धडपडीत आपलीच जवळची माणसे अनेक अडथळे निर्माण करतात. तेव्हा तो शिक्षक उद्विग्न होतो आणि एका विचारापर्यंत पोहोचतो. तो विचार म्हणजे, विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणारा हुशार शिक्षक घडवायचा असेल तर त्याला भीती नाही, तर प्रोत्साहन मिळायला हवं. हा संदेश ही कथा वाचकांच्या मनापर्यंत पोहोचवते.

गुरज्या... मपलं लगानं झालं बा..' या कथेतून बालविवाहाची भीषणता आणि त्याचे दूरगामी परिणाम प्रभावीपणे उलगडले आहेत. 'बोर' या कथेत एका प्रामाणिक सामाजिक कार्यकर्त्याच्या निःस्वार्थ वृत्तीमुळे गावाच्या विकासाला कशी सकारात्मक दिशा मिळू शकते, हे अधोरेखित केले आहे. 'पुरस्कार' आणि 'येथे सी.आर. बदलून मिळतील..' या कथांमधून शिक्षण क्षेत्रात शिरलेल्या अनिष्ट प्रवृत्ती व नैतिक अधःपतनावर नेमके भाष्य केले आहे. 'बांधाचा बळी' ही कथा ग्रामीण भागातील भाऊबंदकीच्या विळख्यात अडकलेल्या वास्तवाचे विदारक चित्र रेखाटते. 'संकल्प एका नव्या चैतन्याचा' या कथेत शहरी तरुणाने आपल्या गावाशी नाळ जपून सामाजिक परिवर्तन कसे घडवून आणता येते, याचा प्रेरणादायी संदेश दिला आहे. तसेच 'पतिव्रता... परिस्थितीने दिलेला निर्णय' आणि 'वासना... अपराध की सबब' या कथांमधून संवेदनशील सामाजिक विषयांना धाडसाने स्पर्श करत वेगळा कथनप्रयोग करण्यात आला असून, तो प्रभावी आणि यशस्वी ठरल्याचे जाणवते. एकूणच या पुस्तकातील सर्वच कथा अनुभव समृद्ध करणाऱ्या आणि वाचकांच्या मनाचा ठाव घेणाऱ्या आहेत.

या पुस्तकाला ज्येष्ठ साहित्यिक संदीप वाकचौरे यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभली आहे. ते म्हणतात, 'अशोक शेटे यांच्या 'अनुभवाचे अंतरंग' या कथासंग्रहातील भाव अत्यंत तरल आहे. अनुभव टिपण्याची दृष्टी, निरीक्षण शक्ती अधिक सूक्ष्म आहे. एखाद्या घटनेकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोनही अनेक कथांमध्ये प्रतिबिंबित झालेला आहे. त्यांचा हा कथालेखनाचा पहिलाच प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे.' ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक डॉ. कैलास दौंड यांनी सकारात्मक जीवनभाष्य करणारा एक तरल कथासंग्रह म्हणून 'अनुभवाचे अंतरंग' या कथासंग्रहाचा गौरव केला आहे. ते म्हणतात, 'या कथासंग्रहातून लेखकाचे अत्यंत संवेदनशील मन आणि सभोवतालच्या घटनांकडे पाहण्याची विलक्षण दृष्टी चांगुलपणाचा परिपोष आणि सत्याचा शोध घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न डोकावतो.' प्रसिद्ध साहित्यिक व व्याख्याते डॉ.संजय कळमकर यांची पाठराखण पुस्तकाला लाभली आहे.

अशोक शेटे यांचा हा पहिलाच कथासंग्रह असला तरी तो वाचकांचे लक्ष वेधून घेणारा आहे. अशोक शेटे एक उत्तम शिक्षक असल्यामुळे या पुस्तकातील बऱ्याच कथा विद्यार्थी, शिक्षक आणि शाळा या विषयांना उजाळा देणाऱ्या ठरतात. शालेय जीवनात आपल्याला सहज घेऊन जातात. या पुस्तकात एकूण सत्तावीस आखूडशिंगी लघुकथा आहेत. प्रत्येक कथेला काहीतरी सांगायचे आहे. आणि विशेष म्हणजे त्या कथेचे सांगणे वाचकापर्यंत सहज पोहोचतेही, हेच या कथासंग्रहाचे वैशिष्ट्य आहे असे मला वाटते.



**एकनाथ आव्हाड**
**बाल साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कवी व लेखक**

# काँग्रेसच्या संघटन बांधणीचा डॉ. वनकरांनी घेतला आढावा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. अनिरुद्ध वनकर यांच्या अहिल्यानगर जिल्हा दौऱ्याचे उत्साहात आयोजन करण्यात आले. संगमनेर येथे आगमन झाल्यानंतर काँग्रेसच्या अनुसूचित जाती विभागाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे स्वागत केले.

अनुसूचित जाती विभागाचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष बंटी यादव यांच्या नेतृत्वाखाली पँथर माणिकराव यादव, माजी जिल्हा कार्याध्यक्ष संतोष गायकवाड, संगमनेर शहर काँग्रेस अध्यक्ष सोनू गायकवाड, जिल्हा सरचिटणीस रामनाथ गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष शशिकांत थोरात, तालुका कार्याध्यक्ष दगडू साळवे, राहुरी तालुका काँग्रेस अध्यक्ष संजय संसारे, दत्ता अवचिते, श्रवण गायकवाड, नितीन आल्हाट, संकेत आल्हाट यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या दौऱ्यात डॉ. वनकर यांनी अहिल्यानगर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाच्या संघटनात्मक बांधणीचा सविस्तर आढावा घेतला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तसेच पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याबाबत त्यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी शिर्डी लोकसभा मतदारसंघातील संघटनात्मक परिस्थितीचाही त्यांनी आढावा घेतला. मतदारसंघातील सामाजिक व राजकीय परिस्थिती, बूथनिहाय संघटनात्मक रचना तसेच कार्यकर्त्यांच्या अडचणी आणि अपेक्षा जाणून घेतल्या. कार्यकर्त्यांशी संवाद साधताना डॉ. वनकर यांनी संविधान आणि आरक्षणाच्या संरक्षणासाठी काँग्रेसची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले.

## संपादकीय...

# मोबाईलच्या पडद्याआड हरवतेय तरुणाई

मोबाईल हा आजच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. संवाद, शिक्षण, व्यवसाय, बँकिंग, मनोरंजन अशा जवळपास प्रत्येक क्षेत्रात मोबाईलने मोठी सोय निर्माण केली आहे. मात्र, सुविधेचे साधन असलेला हा मोबाईल आता अनेकांच्या आयुष्याचा केंद्रबिंदू बनत चालला आहे. विशेषतः तरुणाई आणि विद्यार्थ्यांमध्ये मोबाईलचा वाढता वापर ही आता केवळ वैयक्तिक सवयीची बाब राहिलेली नसून सामाजिक चिंतेचा विषय बनली आहे. आज अनेक घरांमध्ये एकाच छताखाली राहणारी माणसे एकमेकांशी संवाद साधण्याऐवजी आपापल्या मोबाईलच्या पडद्यावर गुंतलेली दिसतात. कुटुंबातील संवाद कमी होत आहे. मित्रांमधील प्रत्यक्ष भेटी कमी होत आहेत. मैदानी खेळ, वाचन, सांस्कृतिक उपक्रम आणि सामाजिक सहभाग यांची जागा हळूहळू सोशल मीडिया आणि व्हिडीओ कंटेंटने घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या बाबतीत ही समस्या अधिक गंभीर आहे. अभ्यासासाठी मोबाईलचा वापर आवश्यक असला तरी त्याच मोबाईलवर मनोरंजन, गेमिंग आणि सोशल मीडियाचे आकर्षण असल्याने विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होते. काही मिनिटांसाठी मोबाईल हातात घेतलेला विद्यार्थी तासन्तास त्यात अडकून राहतो. परिणामी अभ्यासाची सवय, एकाग्रता आणि वेळेचे नियोजन यावर परिणाम होतो. यासाठी मोबाईल पूर्णपणे बंद करणे हा उपाय नाही. उलट, मोबाईलचा योग्य वापर शिकवणे ही काळाची गरज आहे. पालकांनी मुलांवर केवळ निर्बंध लादण्याऐवजी त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे. शाळांनी डिजिटल शिस्त, सायबर सुरक्षितता आणि सोशल मीडियाच्या योग्य वापराबाबत विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले पाहिजे. घरातही ठराविक वेळ मोबाईलमुक्त ठेवण्याची सवय निर्माण होणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानापासून दूर जाणे शक्य नाही आणि ते आवश्यकही नाही. प्रश्न तंत्रज्ञानाचा नसून त्याचा वापर कोणत्या मर्यादेपर्यंत करायचा, याचा आहे. मोबाईल आपले जीवन सोपे करण्यासाठी आहे; त्याने आपले जीवनच नियंत्रित करू नये. आजची तरुणाई ही उद्याच्या भारताची ताकद आहे. तिच्या हातात मोबाईल असण्यापेक्षा त्या हातात कौशल्य, पुस्तक, क्रीडासाहित्य आणि सर्जनशीलतेची साधने असणे अधिक महत्त्वाचे आहे. स्क्रीनच्या आभासी जगात रमण्यापेक्षा प्रत्यक्ष आयुष्यातील नाती, निसर्ग, खेळ आणि माणुसकी यांचा अनुभव घेण्याची संधी तरुणांना मिळाली पाहिजे. मोबाईल वापरायचा आहे; पण मोबाईलचा गुलाम व्हायचे नाही. ही जाणीव प्रत्येक घरात आणि प्रत्येक तरुणाच्या मनात निर्माण झाली, तर तंत्रज्ञान विकासाचे साधन ठरेल; व्यसनाचे नाही. मोबाईलच्या अतिवापरामुळे तरुणांच्या झोपेच्या सवयी, मानसिक एकाग्रता आणि सामाजिक वर्तनावरही परिणाम होत असल्याचे दिसून येते. रात्री उशिरापर्यंत स्क्रीन पाहण्याची सवय झाल्याने सकाळची दिनचर्या बिघडते आणि दिवसभरातील कार्यक्षमता कमी होते. त्यामुळे पालकांनी मुलांच्या मोबाईल वापरावर लक्ष ठेवण्याबरोबरच त्यांना खेळ, वाचन, कला, व्यायाम आणि प्रत्यक्ष सामाजिक संवादासाठी प्रोत्साहित करणे गरजेचे आहे.

## शुद्धिपत्रक

इंदिरा महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था राजापूर, ता. संगमनेर जिल्हा अहिल्यानगर या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस दैनिक युवावार्तामध्ये १९ ऑगस्ट २०२६ रोजी प्रकाशित झाली आहे. यामध्ये नोटीस दिनांक ६ जुलै २०२५ असे प्रकाशित झाले असून ते १८ ऑगस्ट २०२६ असे वाचावे. तसेच सभेपुढील येणाऱ्या विषयांमध्ये क्रमांक १५) रोप्य महोत्सव वर्षानिमित्त नियोजन करणे बाबत असे वाचावे.

**मा.संचालक मंडळाच्या आदेशाने**
**श्री. खतोडे भाऊसाहेब रामभाऊ (मॅनेजर)**
**इंदिरा महिला ग्रा. बि. शेती सह. पत. मर्या., राजापूर**

## जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णन - अ) जिल्हा अ.नगर सब डिस्ट्रीक्ट व तालुका राहाता पैकी मौजे निर्मळ पिंप्री, शिवारातील शेतजमीन मिळकत गट नंबर ७८९/३ क्षेत्र ०० हे २८ आर, आकार ० रु ४२ पैसे, यांसी चर्तुसिमा पुर्वेस- नगर मनमाड रोड, दक्षिणेस ग.नं. ७८९ पैकी गांधी यांची मिळकत, पश्चिमेस-तग.नं. ७८९ पैकी, उत्तरेस- ग.नं. ७८९ पैकी माळवदे यांची मिळकत, येणेप्रमाणे चर्तुसिमापुर्वक मिळकत तदंगभुत वस्तु व हक्कांसह. वर नमूद मिळकतीचे संदर्भाने आमचे अशील शिवाजी माधव अभंग यांनी सतिश पात्रिक महंकाळे, वगैरे यांचेविरुध्द राहाता येथील मे. सिव्हील जज्ज साहेब सि.डी. यांचे कोर्टात जुना रे.मु.नं. ४३/२०१४ (नवीन स्पे.मु.नं.३३/२०१९) चा दावा जाहीर ठरावासाठी व मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. सदरचा दावा प्रलंबित आहे. सदरचा दावा प्रलंबित असतांना दाव्यातील प्रतिवादी नं २ व ३ रामचंद्र पांडुरंग निर्मळ व तुकाराम ऊर्फ नितीन विठ्ठल निर्मळ यांनी प्र.वादी नं ४ व ५ यांना दावा मिळकतीचे बेकायदेशीर खरेदीखत करुन दिलेले आहे. त्या अनुषंगाने मे. राहाता न्यायालयात न्यायाचे दृष्टीने योग्य तो आदेश होणेकामी आमचे अशीलांनी अर्ज दिलेला आहे. सदर प्रस्तावित प्रतिवादी हे देखील दावा मिळकतीचे हस्तांतर करण्याचे प्रयत्नात आहेत व तशा हालचालीही त्यांनी सुरु केलेल्या आहेत.

सबब कोणीही वर वर्णन केलेल्या मिळकतीचे संदर्भाने कोणत्याही स्वरूपाचा व्यवहार जसे की, खरेदीखत, गहाणखत, भाडेपट्टा इत्यादी स्वरूपाचे व्यवहार करू नये, केल्यास सदर व्यवहारास आमच्या अशीलांची सक्त हरकत असणार आहे. सदर व्यवहाराचे संदर्भाने कोणासही कोणत्याही प्रकारे मिळकतीचा मालकी हक्क व कब्जा मिळणार नाही याची नोंद घ्यावी. सबब कोणाचीही फसवणूक होऊ नये याकरिता सदरची नोटीस दिली असे.

ही जाहीर नोटीस दिली असे.

**राहाता**
**दिनांक १७.०८.२०२६**

**ॲड. वाय. बेल्हेकर**
**राहाता कोर्ट, राहाता**

# जिजामाता स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर येथील जिजामाता स्कूलमध्ये भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन देशभक्ती, उत्साह आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात इयत्ता दहावीची माजी विद्यार्थिनी व प्रमुख पाहुण्या समृद्धी सातपुते यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत राष्ट्रगीताचे गायन केले.

स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून देशभक्तीची भावना जागृत केली. इयत्ता पाचवी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी आकर्षक बांबू डान्स व रिबन डान्स सादर करून उपस्थितांची उत्स्फूर्त दाद मिळवली. विद्यार्थ्यांच्या कलात्मक व उत्स्फूर्त सादरीकरणामुळे कार्यक्रमात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले. यावेळी धनश्री पवार, धनंजय पवार, सान्वी शिंदे आणि अर्णव कुलकर्णी या विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत देशभक्तीपर विचार मांडले. त्यांच्या प्रभावी भाषणातून स्वातंत्र्याचे महत्त्व, देशाप्रती असलेली जबाबदारी आणि राष्ट्रप्रेमाची भावना व्यक्त झाली.

माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी 'दांडी यात्रा' या ऐतिहासिक घटनेवर आधारित हृदयस्पर्शी नृत्य सादर केले. महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या दांडी यात्रेचा स्वातंत्र्यलढ्यातील महत्त्वपूर्ण इतिहास विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्याविष्कारातून जिवंत केला. या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या इ.१० वी च्या माजी विद्यार्थिनी समृद्धी सातपुते यांनी आपल्या मनोगतात, आज मला माझ्याच शाळेत प्रमुख पाहुणी म्हणून ध्वजारोहण करण्याचा मिळालेला मान हा माझ्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. यामागे माझी मेहनत आणि अभ्यासातील सातत्य आहे. तुम्हीही आतापासूनच चांगला अभ्यास आणि मेहनत केली, तर भविष्यात तुम्हालाही अशाच प्रकारे सन्मान मिळू शकतो, असे सांगत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात विविध सांस्कृतिक उपक्रम सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे शाळेचे सचिव प्रा. विठ्ठलराव शेवाळे यांनी कौतुक व अभिनंदन केले. आपल्या मनोगतात त्यांनी सांगितले की, स्वातंत्र्यासाठी महान व्यक्तींनी केलेला त्याग वाया जाऊ नये यासाठी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांची जबाबदारी वाढली आहे. समाजातील एकता व सलोखा जपण्याचे काम प्रत्येकाने केले पाहिजे. पालकांनी मुलांची विचारसरणी, जीवनशैली, अभ्यास तसेच मोबाईलच्या वापराकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना अहिल्यानगर येथील भुईकोट किल्ल्याची क्षेत्रभेट घडवून आणण्याची महत्त्वपूर्ण घोषणाही यावेळी करण्यात आली. इतिहासाचा अभ्यास केवळ पुस्तकांपुरता मर्यादित न राहता विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक स्थळांना प्रत्यक्ष भेट देऊन इतिहासाचा अनुभव घ्यावा, हा या क्षेत्रभेटीमागील उद्देश असल्याचे सांगण्यात आले.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कार्यक्रमांतून स्वातंत्र्यसैनिकांचे बलिदान, देशप्रेम, राष्ट्रीय एकता आणि राष्ट्रनिष्ठेचा संदेश देण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. 'देशाच्या प्रगतीसाठी प्रत्येक नागरिकाने आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडावे' हा प्रेरणादायी संदेश देत स्वातंत्र्य दिन सोहळ्याची सांगता झाली.

कार्यक्रमप्रसंगी शाळेचे चेअरमन डॉ. माणिकराव शेवाळे, खजिनदार बापूसाहेब भालेराव, प्रा.ज्ञानेश्वर गोंटे, पालक, शिक्षक व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# देशाच्या प्रगतीसाठी, स्वातंत्र्य जपण्यासाठी सक्षम व प्रामाणिक नागरिक बना - कानडे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील मालपाणी विद्यालयात भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन विविध उपक्रमांनी उत्साहात संपन्न झाला. ध्वजारोहण प्रमुख पाहुणे व मालपाणी विद्यालयाचे सेवानिवृत्त शिक्षक चंद्रशेखर कानडे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयुर्वेदिक तज्ज्ञ डॉ. विकास करंजेकर आणि नगरसेविका साक्षी सूर्यवंशी होते.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा सुवर्णाताई मालपाणी, उपाध्यक्ष केदारनाथ राठी, सचिव सतीश लाहोटी, संचालिका रमा मणियार, कांताबाई बूब, मुख्याध्यापक उत्तम एरंडे, सुनीता पवार, तारा आसावा, पर्यवेक्षिका रंजना पवार आदी मान्यवर उपस्थित होते. स्काउट-गाईड पथकाने बँड पथकाच्या साथीने मान्यवरांना मानवंदना दिली.

उपस्थित मान्यवरांचा परिचय व सत्कार सविता गोडसे यांनी करून दिला. याप्रसंगी गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा वाचनीय पुस्तके भेट देऊन गौरव करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांनी शासनाने सुचविलेल्या देशभक्तीपर गीतांवर संगीत कवायत सादर केली. विद्यालयाच्या गीतमंचाने 'भारत माता माझी लावण्याची खाण' हे गीत सादर केले. आराध्या संदीप पुजारी (४थी ) व अमिरा सलीम शेख ( ६ वी ) यांनी स्वातंत्र्य दिनावर भाषण केले. 'कपूरगौरम' या गीतावर माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी योगाचे प्रात्यक्षिक केले, तर विद्यार्थिनींनी 'लहराओ तिरंगा' या देशभक्तीपर गीतावर सुंदर नृत्य सादर केले.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना चंद्रशेखर कानडे यांनी, आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सध्याच्या घडामोडींवर भाष्य केले. स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी सैनिक होणे महत्त्वाचे असले, तरी देशाला शिक्षण, विज्ञान, शेती, उद्योग, प्रशासन अशा सर्वच क्षेत्रांतील सक्षम व प्रामाणिक व्यक्तींची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांकडून स्व-प्रतिज्ञा म्हणवून घेत सार्वजनिक संपत्तीची जपणूक व पर्यावरण संवर्धन करण्याचे आवाहन त्यांनी केले. निमंत्रित केल्याबद्दल त्यांनी संस्था चालकांचे आभार मानले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. विकास करंजेकर यांनी १८५७ च्या उठावापासून भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा प्रेरणादायी इतिहास उलगडला. भारताला मिळालेले स्वातंत्र्य हे क्रांतिकारकांच्या त्याग, बलिदान आणि संघर्षाचे फलित असल्याचे त्यांनी सांगितले. महात्मा गांधी यांच्या 'चले जाव' आंदोलनाचा उल्लेख केला . मिळालेले स्वातंत्र्य जपणे आणि देशाच्या प्रगतीत योगदान देणे, हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असल्याचे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य टिकविण्याचे आवाहन केले.

# डॉ. इथापे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कॉलेजचा शंभर टक्के निकाल





युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर मेडिकल फाउंडेशन अँड रिसर्च इन्स्टिटट्यूट संचालित डॉ. इथापे इन्स्टिटट्यूट ऑफ फार्मसी वेल्हाळे, संगमनेर मधील बी. फार्मसी अभ्यासक्रमाचा विद्यापीठाचा निकाल नुकताच जाहीर झाला असून संस्थेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत संस्थेच्या १०० % निकाल व शैक्षणिक गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दर्जेदार शिक्षण, अनुभवी प्राध्यापकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, आधुनिक प्रयोगशाळा, डिजिटल स्मार्ट ग्रंथालय, नियमित शैक्षणिक उपक्रम, वैयक्तिक समुपदेशन आणि विद्यार्थीकेंद्रित अध्यापन पद्धती यावर संस्थेचा विशेष भर असून त्यामुळेच हा यशस्वी परिपाक असल्याचे मानले जात आहे.

निकालामध्ये कु. मोनाली साहेबराव घुगे हिने SGP- ८.६४ गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला, कु. श्रद्धा सिताराम शिंदे हिने SGP- ८.५५ गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. तर कु. पूनम नवनाथ म्हस्के हिने SGP- ८.४५ गुणांसह तृतीय क्रमांक संपादन केला. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोकराव इथापे साहेब यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या मेहनत, चिकाटी आणि शिस्तीचे कौतुक केले. तसेच संस्थेचे सचिव अनिकेत इथापे सर यांनी विद्यार्थ्यांनी भविष्यातही उत्कृष्ट कामगिरी करत संस्थेचे नाव अधिक उंचवावे अशा शुभेच्छा दिल्या.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे प्राचार्य डॉ. महेंद्र गिरी, उपप्राचार्य डॉ. अविनाश मनसुख तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# स्वातंत्र्यदिनानिमित्त खांडगावात ज्येष्ठ नागरिकांचा कृतज्ञता सोहळा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून खांडगाव ग्रामपंचायतीच्या वतीने गावातील ज्येष्ठ नागरिकांचा कृतज्ञता सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. गावाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि विकासात्मक वाटचालीत मोलाचे योगदान देणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना यावेळी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

ज्येष्ठ नागरिक हे गावाच्या समृद्ध अनुभवाचे आणि संस्कारांचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या आयुष्यभराच्या अनुभवातून नव्या पिढीने प्रेरणा घ्यावी, त्यांच्या योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त व्हावी आणि समाजामध्ये ज्येष्ठांविषयी आदराची भावना अधिक दृढ व्हावी, या उद्देशाने ग्रामपंचायतीने हा उपक्रम राबविला. सन्मान स्वीकारताना ज्येष्ठ नागरिकांनी आनंद व्यक्त केला. आपल्या कार्याची आणि योगदानाची गावाने घेतलेली दखल ही मनाला समाधान देणारी असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामपंचायतीच्या या कृतज्ञता उपक्रमाचे संगमनेर तालुक्यात सर्वत्र कौतुक होत आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यमान सरपंच ड. विकास गुंजाळ, उपसरपंच सुनील रुपवते, ग्रामविकास अधिकारी उज्वला नवले, ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य व कर्मचारी तसेच गावातील प्रमुख पदाधिकारी यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमास ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्येष्ठांचा सन्मान म्हणजे त्यांच्या अनुभवाचा, कर्तृत्वाचा आणि योगदानाचा गौरव होय. त्यांच्या अनुभवातून नव्या पिढीला दिशा मिळते. हा संदेश या उपक्रमातून अधोरेखित झाला.

खांडगाव ग्रामपंचायतीने स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने राबविलेला हा आगळावेगळा आणि समाजाभिमुख उपक्रम ज्येष्ठांचा सन्मान, नव्या पिढीला प्रेरणा आणि समाजातील कृतज्ञतेची भावना वृद्धिंगत करणारा ठरला.


SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

**पाहिजेत**
सुंदरम गोल्ड आणि प्लास्टिक, संगमनेर
ऑफसेट मशिन ऑपरेटर १ जागा
स्क्रिन प्रिटींग – २ जागा
टेलीकॉलर – २ (महिला)
– संपर्क –
९८२२४५३०३६

**पाहिजेत**
श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स्
श्री गणेश टायर्स
श्री गणेश ऑइल सेंटर
या फर्मसाठी
अकाऊंटंट - 2 जागा
पुरूष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक
कामाचा अनुभव आवश्यक
८९९९८६२७५१

**पाहिजेत**
डाटा एन्ट्री ऑपरेटर - २
शिक्षण - ग्रॅज्युवेट/१२ वी –
डायलिसिस टेक्निशियन -२
कॅथलॅब टेक्निशियन - १
नर्सिंग सुपरवाईझर -१
कुटे हॉस्पिटल
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,
8888882225
9766855593

नेवासकर ऑटोमोबाईल्स
**पाहिजेत**
सर्व्हीस सुपरव्हायझर
२ जागा
संगमनेर
8793223344
8446300400

**फ्लॅट विकणे आहे**
2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
– संपर्क –
8788945208
8208223721

SR THORAT — JOB — GAGANGIRI PACKAGED PURITY

| Sr. No. | Post | QTY | Qualification and Experience |
| --- | --- | --- | --- |
| 1 | Security Guard | 5 | Experience Minimum 5 Year (Ex-Servicemen preferred) |
| 2 | Fitter/Welder/ Mechanical/ Electrical/ Refrigeration | 5 | ITI,DME or any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 3 | Data Operator/ Supervisor | 5 | Any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 4 | Chemist | 5 | B.Sc. Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |

Office Address-S.R.Thorat Milk Products Pvt.Ltd, Rajapur Road,Sangamner, Dist- Ahilyanagar
Mobile Number – 9860100936/937
Sent the CV Following E-Mail Id:
admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com



# डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या पुढाकारातून मुलींच्या स्वसंरक्षणासाठी मुक्कामार अभियान - इशिता शर्मा



## ॲसिड हल्ल्यातील आरोपी सापडत नाही हे दुर्दैव

**७ मार्च रोजी वडगावपान येथील चिमुकलीवर ॲसिड हल्ला झाला. पाच महिने उलटून गेले तरी अद्याप आरोपी पोलिसांना सापडले नाही हे अत्यंत दुर्दैवी बाब आहे. महिला व मुलीवर अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा मिळाली तर असे गुन्हे घडणार नाही याचबरोबर वडगाव पान असेल हल्लयातील आरोपीची लवकरात लवकर चौकशी होऊन त्याला कठोर शिक्षा मिळाली पाहिजे असेही डॉ. जयश्रीताई थोरात यांनी म्हटले आहे.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भारतीय परंपरेमध्ये महिलांना मोठा सन्मान आहे मात्र सध्या मुली व महिलांवरील वाढलेले अत्याचार हे अत्यंत दुर्दैवी आहेत. मुलींमध्ये आत्मनिर्भर होण्याबरोबर स्वसंरक्षणासाठी आत्मविश्वास निर्माण होण्याकरता कॅन्सर तज्ञ डॉक्टर जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून तालुक्यामधील २७ विद्यालयांमधून मुक्कामार हे अभियान राबवले जाणार असल्याचे प्रसिद्ध हिंदी चित्रपट अभिनेत्री तथा मुक्कामार फाउंडेशनच्या संस्थापक इशिता शर्मा यांनी सांगितले आहे.

डि.के. मोरे जनता विद्यालय वडगाव पान येथे एकविरा फाउंडेशन व मुक्कामार फाउंडेशन यांच्यामध्ये मुलींना वर्षभर ट्रेनिंग देण्याबाबत सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी मा. आमदार डॉ. सुधीर तांबे, सौ. दुर्गाताई तांबे, मुक्कामार संस्थेच्या संस्थापक अभिनेत्री इशिता शर्मा, एकविरा फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात, बाबासाहेब ओहोळ, ट्रेनर अक्षिता करकेरा, श्रद्धा सोनार, ऋषभ चोप्रा, विलास दिघे, बाळासाहेब गायकवाड, निलेश थोरात, अरुण कुळधरण, पद्माताई थोरात, बेबीताई थोरात, रुपालीताई थोरात, डॉ. नितीन भांड, डॉ. वृषाली साबळे, अभिजीत बेंद्रे , शेखर सोसे, प्रीतम साबळे, मुख्याध्यापक पि.के दये, पर्यवेक्षक आहेर, के. डी. देशमुख मिलिंद आवटी यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना अभिनेत्री इशिता शर्मा म्हणाल्या की, सध्या देशामध्ये महिला व मुली सुरक्षित नाहीत. दररोज मुलींवर अत्याचार होत आहे हे अत्यंत दुर्दैवी आहे महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे आणि या महाराष्ट्रामध्ये अशा घटना म्हणजे कलंक आहेत. मुलींनी स्वतः आत्मनिर्भर झाले पाहिजे याकरता मुक्कामार फाउंडेशनच्यावतीने मुलींना वर्षभर खेळाडू फायटर बनवण्यासाठी ट्रेनिंग देण्यात येणार आहे. संगमनेर तालुक्यामध्ये डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबवला जात असून हा संपूर्ण राज्यासाठी दिशादर्शक ठरेल असे त्या म्हणाल्या.

तर मा.आ. डॉ सुधीर तांबे म्हणाले की, मुलींवरील वाढते अत्याचार ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. मुलींनी चांगला आहार घेण्याबरोबर शरीर तंदुरुस्त ठेवले पाहिजे. स्वतःमध्ये धाडस निर्माण केले पाहिजे. कुणी त्रास देत असेल तर बिलकुल लपून ठेवू नका त्याबाबत तातडीने शाळांमध्ये किंवा पोलिसांमध्ये तक्रार करा. तर डॉ.जयश्रीताई थोरात म्हणाल्या की लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली एकविरा फाउंडेशनने संगमनेर तालुक्यात महिला सबलीकरण करता अत्यंत चांगले काम केले आहे. मुक्कामार या अभियानांतर्गत मुलींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

# जिल्हा बँक निवडणुकीचा बिगुल वाजणार

## बँकेसाठी ३ हजार ६७७ मतदार

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर -गेल्या चार महिन्यांपासून प्रशासक असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक संभाजी निकम यांनी मंगळवार (दि.१८) निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली असून येत्या ३१ ऑगस्टपर्यंत हरकती व सुचना करण्याची मुदत देण्यात आली आहे. अंतिम मतदार यादी १५ सप्टेंबरला प्रसिद्ध होणार असून त्यानंतर बँकेच्या २१ संचालकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होईल. दरम्यान, यंदा निवडणुकीसाठी बँकेचे ३ हजार ६७७ मतदार आहेत. त्यात ३६६ संस्थेचे ठराव अपात्र ठरले असून २३३ संस्थांनी ठराव सादर केले नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकांची मुदत २० फेब्रुवारी रोजी संपुष्टात आली. मात्र, मे महिन्यात बँकेवर प्रशासक मंडळ नियुक्त करण्यात आले होते. त्यानंतर जून महिन्यात विविध कार्यकारी सेवा सोसायट्या, कृषी पणन संस्था व शेतमाल प्रक्रिया संस्था (शेती पुरक मतदारसंघ) व बिगर शेती संस्था मतदारसंघा अशा संस्थाचे १६ जुन ते १६ जुलैपर्यंत ठराव मागविण्यात आले होते. त्यानुसार निवडणूक अधिकारी निकम यांच्याकडे जिल्हा बँकेने ५ हजार ८९० सभासदांची (मतदारांची यादी) पाठवली होती. यातून ठराव उपलब्ध झालेल्या विविध कार्यकारी सेवा सोसायटी संस्थांचे १ हजार ३६७, बिगर शेती मतदारसंघातून १ हजार ५९५ तर शेती पुरक मतदारसंघातून १ हजार ५१ असे ४ हजार १३ संस्थांचे ठराव निवडणूक निर्णय अधिकारी निकम यांच्या उपलब्ध करून देण्यात आले होते. यातून निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या यंत्रणेने तपासून ३६६ ठराव अपात्र केले. त्यात विविध कार्यकारी सेवा सोसायटी संस्थांचे ७, बिगर शेती मतदारसंघाचे १२४ तर शेती पुरक मतदारसंघाचे २३५ यांचा सामवेश आहे.

तर २३३ संस्थांनी ठराव दिले नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यात विविध कार्यकारी सेवा सोसायटी संस्थांचे २७, बिगर शेती मतदारसंघाचे १५६ तर शेती पुरक मतदारसंघाचे ५० संस्थांचा समावेश आहे. त्यामुळे बँकेच्या निवडणुकीसाठी आता सेवा सोसायटी मतदारसंघ, बिगरशेती मतदारसंघ आणि शेती पूरक मतदारसंघातून ३ हजार ६४७ आणि ३० व्यक्तीगत असे ३ हजार ६७७ मतदार निश्चित झाले आहेत. त्यानुसार आज सकाळी ११ वाजता बुधवारी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होणार असून त्यावर हरकती व सुचना करण्यासाठी ३१ ऑगस्ट मुदत देण्यात आली आहेत.

# जुन्नर हादरले ! १० वर्षीय मुलीवर अत्याचारानंतर हत्या

पुणे (वृत्तसंस्था)

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे तीन वर्षीय चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याची घटना ताजी असतानाच, जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे पुन्हा एकदा माणुसकीला काळिमा फासणारी घटना समोर आली आहे. घराशेजारी राहणाऱ्या २५ वर्षीय तरुणाने १० वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याचा प्राथमिक संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या घटनेने पिंपळवंडी परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. पीडित मुलगी मंगळवारी दुपारपासून बेपत्ता होती. कुटुंबीयांनी तिचा शोध घेतल्यानंतर आळेफाटा पोलिसांकडे तक्रार दिली. पोलिसांनी गावातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली. दरम्यान, मंगळवारी रात्री साडेनऊच्या सुमारास लेंडेस्थळ येथे ओढ्याच्या कडेला एका झाडाजवळ मुलीचा मृतदेह आढळून आला.

मुलीचा शोध सुरू असताना पोलिसांनी गावातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. या तपासादरम्यान एका २५ वर्षीय तरुणावर पोलिसांचा संशय बळावला. त्याला ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. चौकशीतून मुलीचा मृतदेह आढळलेल्या ठिकाणाची माहिती मिळाल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. विशेष म्हणजे, संशयित तरुण हा मुलीच्या शोधासाठी सुरू असलेल्या तपासात ग्रामस्थांमध्ये मिसळून पोलिसांसोबत सीसीटीव्ही फुटेज पाहण्यात सहभागी होत होता. मात्र, पोलिसांच्या तपासादरम्यान त्याच्या हालचाली संशयास्पद आढळल्यानंतर त्याला ताब्यात घेण्यात आले.

# पक्षादेश झुगारणाऱ्या कर्जतच्या ६ नगरसेवकांवर अपात्रतेची कारवाई

कर्जत: नगराध्यक्षावरील अविश्वास ठराव अन नव्याने निवडीचा कर्जतच्या राजकीय पटलावरील दोन दिग्गज नेत्यांच्या लढाईचा पहिला अंक संपला अन लगेचच दुसरा सुरू झाला तो उपनगराध्यक्षांवरील अविश्वासावरून. उपनगराध्यक्षांवरील अविश्वासाच्या सभेला पक्षादेश डावलून गैरहजर राहणाऱ्या सहा नगरसेवकांना अपात्र ठरविण्याचा निर्णय जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी आज मंगळवारी (दि.१८) दिला. अपात्र झालेल्यांत राष्ट्रवादी व काँग्रेसच्या प्रत्येकी तिघा नगरसेवकांचा समावेश असून त्यांना सहा वर्षे निवडणूक लढविण्याला बंदी घालण्यात आली आहे. सतीश उद्धवराव पाटील यांनी दाखल केलेला सदस्य अनर्हता प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी मंजूर केला आहे. महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८६ मधील कलम ३(१)(ब) तसेच सदस्य अनर्हता नियम १९८७ मधील तरतुदींच्या आधारे जिल्हाधिकाऱ्यांनी अपात्रतेचा निर्णय दिला.

उपनगराध्यक्ष संतोष सोपान मेहत्रे यांच्याविरोधात अविश्वास ठराव आणण्यासाठी विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेस उपस्थित राहून पक्षाच्या निर्देशानुसार मतदान करण्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गटाकडून संबंधित सदस्यांना व्हिप बजावण्यात आला होता. मात्र, संबंधित सहा सदस्य विशेष सभेला गैरहजर राहिले. त्यामुळे त्यांनी पक्षाच्या अधिकृत निर्देशाचे उल्लंघन करून पक्षशिस्तीचा भंग केल्याचा आरोप करण्यात आला. याप्रकरणी सतीश उद्धवराव पाटीलयांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८६ अंतर्गत अपात्रतेचा अर्ज दाखल केला होता. कर्जत नगरपंचायतीच्या अपात्रतेबाबत २२ जुलै, ३० जुलै आणि ५ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांसमोर सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान उपाध्यक्षांच्यावतीने वकिलांनी युक्तिवाद केला, तर अर्जदार सतीश सोपान महेरे व अन्य पाच सदस्यांच्या वतीने लेखी म्हणणे सादर करण्यात आले. एकमेकांच्या अर्जावर आक्षेप घेण्यात आले. पक्षादेश, सभेची कार्यवाही आणि दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी अपात्रतेचा निर्णय दिला.सुनावणीदरम्यान मुंबई उच्च न्यायालयातील विविध न्यायनिर्णयांचा संदर्भ देण्यात आला. ज्योती प्रतापसिंग चंडेल विरुद्ध जिल्हाधिकारी, नांदेड व इतर या प्रकरणाचाही संदर्भ देत जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकारक्षेत्राबाबत आक्षेप घेण्यात आला होता.

## दिनविशेष

२००८: — कुस्तीगीर सुशील कुमार यांनी बीजिंग ऑलिम्पिकमध्ये ब्राँझ पदक जिंकले.
१९९५: — भारतातील फिरोजाबाद रेल्वे अपघातात २५८ जणांचा मृत्यू झाला.
१९८८: — ८ वर्षांच्या युद्धानंतर इराण-इराक युद्धबंदी करार झाला.
१९६०: — सेनेगलने आपण मालीपासून स्वतंत्र असल्याचे जाहीर केले.
१९४१: — दुसरे महायुद्ध फ्रान्समधील भुमिगत चळवळ उखडून काढण्याच्या उद्देशाने जर्मनांनी एका दिवसात ५० हजार नागरिकांना अटक केली
१९२०: — डेट्रॉइट,मिशिगन येथे जगातील पहिले व्यावसायिक नभोवाणी केंद्र MK
१९१४: — पहिले महायुद्ध - जर्मन फौजांनी ब्रुसेल्स शहराचा ताबा घेतला.
१८९७: — सर रोनाल्ड रॉस यांनी भारतात हिवतापाच्या जिवाणूचा शोध लावला.
१८२८: — राजाराममोहन रॉय, द्वारकानाथ टागोर, कालिनाथ रॉय यांनी ब्राह्मो समाजाची स्थापना

## जन्म

२००३: प्रिन्स गॅब्रिएल — बेल्जियम देशाचे राजकुमार
१९६६: एनरिको लेटा — इटली देशाचे ५५ वे पंतप्रधान, वकील आणि राजकारणी
१९५६: डेसमंड स्वेन — इंग्रज सैनिक आणि राजकारणी, व्हाईस-चेंबरलेन ऑफ द हाउसहोल्ड
१९४६: लॉरेंट फॅबियस — फ्रान्स देशाचे १५८वे पंतप्रधान, राजकारणी
१९४६: एन. आर. नारायण मूर्ती — भारतीय उद्योगपती, इन्फोसिस कंपनीचे सह-संस्थापक
१९४४: राजीव गांधी — भारताचे ६वे माजी पंतप्रधान आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे समर्थक नेते — भारतरत्न (मरणोत्तर) (निधन: २१ मे १९९१ )
१९४१: स्लोबोडन मिलोसेविच — सर्बिया देशाचे १ले अध्यक्ष, सर्बियन वकील आणि
१९४०: रेक्स सेलर्स — भारतीय-ऑस्ट्रेलियन क्रिकेटर
१९३६: हिदेकी शिरकाव — जपानी रसायनशास्त्रज्ञ, अभियंते आणि शैक्षणिक — नोबेल पुरस्कार
१९३४: आर्मी कुसेला — पहिल्या मिस युनिव्हर्स जिकणाऱ्या फिन्निश-अमेरिकन मॉडेल

## मृत्यू

२०२२: समर बॅनर्जी — भारतीय ऑलिम्पिक फुटबॉलपटू (जन्म: ३० जानेवारी १९३० )
२०२२: ऑस्टॅथिओस पॅथ्रोस — भारतीय सिरियाक ऑर्थोडॉक्स प्रीलेट (जन्म: १२ नोव्हेंबर १९६३
२०२२: सय्यद सिब्ते रझी — भारतीय राजकारणी, खासदार (जन्म: ७ मार्च १९३९ )
२०१४: बी. के. एस. अय्यंगार — भारतीय योगगुरू आणि अय्यंगार योगपद्धतीचे संस्थापक — पद्मविभूषण, पद्मभूषण, पद्मश्री (जन्म: १४ डिसेंबर १९१८ )
२०१३: नरेंद्र दाभोलकर — महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष — पद्मश्री (जन्म: १ नोव्हेंबर १९४५ )
२०१३: जयंत साळगावकर — ज्योतिर्भास्कर, कालनिर्णय कॅलेंडरचे संस्थापक (जन्म: १ फेब्रुवारी १९२९ )
२०१२: डोम मिंटॉफ — माल्टा देशाचे ८वे पंतप्रधान, पत्रकार आणि राजकारणी (जन्म: ६ ऑगस्ट १९१६ )
२०१२: मेलेस झेनावी — इथिओपिया देशाचे पंतप्रधान, सैनिक आणि राजकारणी (जन्म: ९ मे १९५५ )
२०११: राम शरण शर्मा — भारतीय इतिहासकार आणि शैक्षणिक (जन्म: २६ नोव्हेंबर १९१९ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**२० ऑगस्ट**

# १९९५ चा फिरोजाबाद रेल्वे अपघात भारतीय रेल्वेच्या इतिहासातील भीषण दुर्घटना



१९९५ मध्ये भारतातील सर्वात भीषण रेल्वे अपघातांपैकी एक फिरोजाबाद रेल्वे अपघात घडला. उत्तर प्रदेशातील फिरोजाबादजवळ 20 ऑगस्ट 1995 रोजी घडलेल्या या दुर्घटनेत सुमारे 358 जणांचा मृत्यू झाला, तर शेकडो प्रवासी जखमी झाले. त्यामुळे हा अपघात भारतीय रेल्वेच्या इतिहासातील अत्यंत दुखद घटना म्हणून नोंदला गेला.दिल्लीहून पूर्वेकडे जाणारी पुरुषोत्तम एक्स्प्रेस फिरोजाबादजवळून जात असताना तिची समोरून किंवा पुढे उभ्या असलेल्या कालिंदी एक्स्प्रेसला धडक झाली. धडक इतकी भीषण होती की अनेक डबे एकमेकांवर आदळले आणि काही डबे मोठ्या प्रमाणात उद्ध्वस्त झाले. अपघाताच्या वेळी दोन्ही गाड्यांमध्ये मोठ्या संख्येने प्रवासी असल्याने मृतांचा आकडा मोठा झाला.या दुर्घटनेचे प्रमुख कारण म्हणून रेल्वे सिग्नलिंगशी संबंधित त्रुटी आणि गाड्यांच्या हालचालींमध्ये झालेला समन्वयाचा अभाव याकडे पाहिले गेले. अपघातानंतर घटनास्थळी मोठ्या प्रमाणात गोंधळ निर्माण झाला. रेल्वे कर्मचारी, पोलीस, स्थानिक प्रशासन तसेच परिसरातील नागरिकांनी बचावकार्य सुरू केले. अनेक प्रवासी डब्यांमध्ये अडकले होते. जखमींना बाहेर काढण्यासाठी गॅस कटर आणि इतर साधनांचा वापर करण्यात आला.अपघाताची तीव्रता लक्षात घेऊन जवळच्या रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय व्यवस्था करण्यात आली. रक्ताची गरज भासल्याने नागरिकांनीही मदतीसाठी पुढाकार घेतला. मृतांची ओळख पटविणे आणि त्यांच्या नातेवाइकांपर्यंत माहिती पोहोचविणे हे प्रशासनासमोर मोठे आव्हान होते.या दुर्घटनेनंतर भारतीय रेल्वेच्या सिग्नलिंग व्यवस्था, सुरक्षा नियम, रेल्वे कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आणि गाड्यांच्या संचालनातील समन्वय याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले. अशा दुर्घटना टाळण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, अधिक प्रभावी सिग्नलिंग आणि सुरक्षा व्यवस्थेत सुधारणा करण्याची गरज अधोरेखित झाली.फिरोजाबाद रेल्वे दुर्घटनेने अनेक कुटुंबांवर कायमचा आघात केला. रेल्वे प्रवास हा देशातील कोट्यवधी लोकांच्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा भाग असल्याने अशा दुर्घटनांमधून प्रवाशांची सुरक्षितता ही सर्वांत मोठी प्राथमिकता असली पाहिजे, हा महत्त्वाचा धडा मिळाला.

# राजीव गांधी : आधुनिक भारताच्या वाटचालीतील तरुण नेतृत्व

**पुण्यतिथी विशेष**

भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचा जन्म २० ऑगस्ट १९४४ रोजी मुंबई येथे झाला. ते माजी पंतप्रधान इंदिरा गांधी आणि फिरोज गांधी यांचे ज्येष्ठ पुत्र तसेच भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे नातू होते. नेहरू-गांधी कुटुंबातील राजकीय वारसा लाभला असला, तरी राजीव गांधी यांचा सुरुवातीचा कल राजकारणापेक्षा विमानचालनाकडे होता. त्यांनी वैमानिक म्हणूनही काम केले.राजीव गांधी यांचा राजकारणातील प्रवेश परिस्थितीजन्य होता. त्यांचे धाकटे बंधू संजय गांधी यांच्या निधनानंतर त्यांनी सक्रिय राजकारणात प्रवेश केला. १९८१ मध्ये ते अमेठी मतदारसंघातून लोकसभेवर निवडून आले. १९८४ मध्ये इंदिरा गांधी यांची हत्या झाल्यानंतर देशासमोर निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीत राजीव गांधी यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारली. वयाच्या अवघ्या ४०व्या वर्षी ते भारताचे सर्वांत तरुण पंतप्रधान झाले.राजीव गांधी यांच्या नेतृत्वाची सर्वांत महत्त्वाची ओळख म्हणजे आधुनिक तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला दिलेले महत्त्व. भारताला २१व्या शतकात घेऊन जाण्याचे त्यांचे स्वप्न होते. संगणक, दूरसंचार, माहिती तंत्रज्ञान आणि आधुनिक विज्ञानाच्या वापराला त्यांनी प्रोत्साहन दिले. देशाच्या प्रशासनात आणि अर्थव्यवस्थेत तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्याची गरज त्यांनी सातत्याने मांडली. त्यामुळे भारताच्या माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राच्या पुढील वाटचालीसाठी त्यांच्या काळातील धोरणात्मक दिशेला महत्त्व दिले जाते.त्यांच्या कार्यकाळात दूरसंचार क्षेत्राच्या विस्ताराला, संगणकीकरणाला आणि तंत्रज्ञानाधारित विकासाला चालना मिळाली. शिक्षण आणि रोजगाराच्या क्षेत्रातही आधुनिक कौशल्यांची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. प्रशासन अधिक कार्यक्षम आणि पारदर्शक करण्यासाठी आधुनिक साधनांचा वापर वाढविण्यावर त्यांनी भर दिला.राजीव गांधी यांनी पंचायतराज संस्थांना अधिक अधिकार देण्याच्या दिशेनेही



प्रयत्न केले. ग्रामीण भागातील विकास, युवकांचा सहभाग आणि प्रशासनाचे विकेंद्रीकरण यांना त्यांनी महत्त्व दिले. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात भारताने आधुनिकता, तंत्रज्ञान आणि जागतिक बदलांशी जुळवून घेण्याच्या दिशेने वेगाने पावले टाकली.१९८९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर त्यांचे पंतप्रधानपद संपले. त्यानंतरही ते राष्ट्रीय राजकारणात सक्रिय राहिले. २१ मे १९९१ रोजी तामिळनाडूतील श्रीपेरुंबुदूर येथे एका आत्मघाती हल्ल्यात त्यांची हत्या झाली.राजीव गांधी यांना त्यांच्या सार्वजनिक जीवनातील योगदानाबद्दल १९९१ मध्ये मरणोत्तर भारतरत्न प्रदान करण्यात आला. भारत सरकारच्या अधिकृत नोंदीनुसार राष्ट्रपतींनी ६ जुलै १९९१ रोजी त्यांना मरणोत्तर भारतरत्न प्रदान करण्याची अधिसूचना जारी केली.तरुण नेतृत्व, आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार आणि भारताला २१व्या शतकासाठी तयार करण्याची दृष्टी यामुळे राजीव गांधी यांचे भारतीय राजकारणातील स्थान वेगळे आहे. त्यांच्या राजकीय कारकिर्दीबाबत विविध मते असली, तरी आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भारताच्या विकासाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न करणारे पंतप्रधान म्हणून त्यांचे योगदान भारतीय इतिहासात महत्त्वाचे मानले जाते.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



श्री महाकालेश्वराचे अलौकिक दर्शन!
श्रावण मासानिमित्त भक्ती शक्ती मंदिरात, उज्जैनच्या श्री महाकालेश्वराचा प्रतिरूपाचे दर्शनाचा लाभ घ्यावा.
श्रावण मासारंभ निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
भक्ती शक्ती मंदिर
डेरे फाउंडेशन कॅम्पस, कऱ्हे फाटा, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर

# संगमनेरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे 'चितेवर' बसून आमरण उपोषण

## आश्वासनाला वाटाण्याच्या अक्षता | चौथ्या दिवशीही उपोषण सुरू

संगमनेर (प्रतिनिधी)

नाशिक -नाशिक - पुणे राष्ट्रीय महामार्गावरील सिन्नर-खेड मार्गावरील विविध प्रलंबित कामांवरून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि ठेकेदार कंपनीच्या कारभाराविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. प्रशासनाने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न केल्याने चौथ्या दिवशीही हे आमरण उपोषण सुरू असून मंगळवार दिनांक १८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी हिवरगाव पावसा टोल नाका येथे थेट चितेवर (सरणावर) बसून राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रवीण कानवडे व विद्यार्थी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गजानन भोसले यांनी आमरण उपोषण सुरू केले. येत्या २४ तासांत प्रशासनाने ठोस कारवाई सुरू न केल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रवीण कानवडे यांनी दिला. या आंदोलनाला छावा ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष विश्वनाथ वाघ यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे.



### ठेकेदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा त्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही - जिल्हाध्यक्ष कपिल पवार

**नाशिक – पुणे राष्ट्रीय महामार्गावर मागील सहा महिन्यात २३ जणांचा मृत्यू झाला आहे. याची जबाबदारी कोण घेणार? १५ दिवसांपूर्वी आम्ही आंदोलन केले होते. तेव्हा आम्हाला टोल प्रशासनाच्या वतीने लेखी आश्वासन देण्यात आले होते. परंतु त्यांनी कोणतेही काम सुरू केले नाही. त्यामुळे नाईलाजास्तव आम्हाला पुन्हा एकदा हे आंदोलन सुरू करावे लागले आहे.आमचा पक्ष सत्तेत असताना सुद्धा आमच्यावर आंदोलन करण्याची वेळ येत आणि ठीम्म प्रशासन त्याची दखल घेत नाही यासारखी दुर्दैवी बाब नाही. जोपर्यंत ठेकेदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत आम्ही आंदोलन मागे घेणार नाही असा सज्जड इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार यांनी दिला आहे.**

प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सिन्नर-खेड महामार्गावरील प्रलंबित व अपूर्ण कामांबाबत १३ जुलै २०२६ रोजी प्रशासनाला पहिले निवेदन देण्यात आले. त्यावर कोणतीही कारवाई न झाल्याने २० जुलै पासून उपोषण सुरू करण्यात आले. त्यावेळी छक्-ख च्या अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर ५ दिवसांनी उपोषण मागे घेण्यात आले. मात्र, लेखी आश्वासन देऊनही महामार्ग प्राधिकरणाने आणि 'शंकर रामचंद्र लिमिटेड' या ठेकेदार कंपनीने प्रत्यक्षात कोणतीही कामे सुरू केली नाहीत. प्रशासनाच्या या उदासीन धोरणामुळे स्वातंत्र्यदिनी पुन्हा एकदा उपोषण आंदोलन सुरू करण्यात आले.

उपोषणाला ४ दिवस उलटूनही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी आणि संबंधित ठेकेदार कंपनीने आंदोलनाची कोणतीही दखल घेतलेली नाही. अधिकारी व ठेकेदार बिनधास्तपणे व सुस्तावल्यासारखे काम करत असल्याचा आरोप केला आहे. सततच्या दुर्लक्षामुळे संतप्त झालेल्या पक्षाधिकाऱ्यांनी आता अत्यंत टोकाचा निर्णय घेतला आहे. हिवरगाव पावसा टोल नाका येथे पुढील २४ तासांत मागण्यांची दखल घेऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात न झाल्यास थेट सरणावर बसून आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.

या आंदोलनात जिल्हा उपाध्यक्ष अशोक काळे, सरलाताई भुजबळ, रईस पठाण, अमोल म्हस्के, संतोष भुजबळ, ज्ञानेश्वर माळी, वैशाली राऊत, प्रदीप आवटी, प्रवीण कासार, अजय शेळके, राजेंद्र पानसरे, जितेंद्र मोकळ, भाऊ म्हस्के, राजाराम शिंदे, दत्तात्रय वाकचौरे, जय बटवाल, ऋषिकेश गुंजाळ आदी सहभागी झाले.

# युवा प्रसार समुहाने लोकप्रबोधनाबरोबरच रोजगार निर्मिती केली - प्राचार्य डॉ. वाघ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आपण ठरवले तर जगात अवघड असे काही नसते. दैनिक युवावार्ताचे संस्थापक संपादक किसन भाऊ हासे यांनी अतिशय संघर्ष आणि जिद्दीच्या जोरावर वृत्तपत्राच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले, जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी काम केल आहे. संगमनेर व परिसरातील अनेक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिली. आज प्रसार माध्यमांतील वेगवेगळ्या विभागात अनेक ठिकाणी प्रशिक्षित व या क्षेत्राची आवड असणाऱ्या मनुष्यबळाची गरज आहे. ही संधी युवा प्रसार माध्यम समुहाने उपलब्ध करून दिली असून तरुणांनी या संधीचे सोने करावे असे आवाहन बीएसटी सह्याद्री महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ यांनी केले.

युवा प्रसार माध्यम समूह, मुंबईच्या वतीने सह्याद्री महाविद्यालयातील के. बी. दादा देशमुख सभागृहात आयोजित कार्यक्रमात प्राचार्य डॉ. वाघ बोलत होते. यावेळी व्यासपीठावर दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे, युवा उद्योग समूहाचे संचालक आनंद हासे, छात्र भारती विद्यार्थी संघटनेचे राज्य अध्यक्ष अनिकेत घुले, मुक्त पत्रकार संदिप सातपुते, डॉ. बैरागी, प्रा. डॉ. धायवट उपस्थित होते.

या प्रसंगी संपादक किसन भाऊ हासे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, जीवनात श्रमप्रतिष्ठेला महत्त्व दिले पाहिजे. कोणत्याही कामाची लाज वाटता कामा नये. त्यांनी स्वतःचे अनुभव सांगताना म्हटले की, सुरुवातीला ज्ञानमाता शाळेत ग्रंथपाल म्हणून काम केले, नोकरी सोडून नंतर रद्दी जमा करून विकली, रबर स्टॅम्प तयार केले, प्रिंटिंग प्रेस चालवत एक एक टप्पा पार करून आज हा युवा उद्योग समूह उभा राहिला आहे. युवावार्ता आज प्रिंट आणि डिजिटल, इलेक्ट्रॉनिक माध्यमांत आघाडीवर काम करत आहे.

अनेक तरुणांना याठिकाणी रोजगार मिळाला आहे. या क्षेत्रात ज्यांच्याकडे काही कला, गुण आहेत, थोडाफार अभ्यास आहे, शब्दांवर, भाषेवर प्रभुत्व आहे अशा तरुणांना मोठी संधी आहे. आर्थिक आणि सामाजिक प्रतिष्ठा देखील आहे. त्यामुळे ज्यांना या क्षेत्रात करीअर करायचे आहे त्यांना अनेक संधी उपलब्ध आहेत.

युवा पॉलिप्रिंटचे संचालक आनंद हासे यांनी आजच्या जेन झी पुढील आव्हाने, असणाऱ्या संधी बाबत मार्गदर्शन केले. ज्यांना जीवनात चांगले यश मिळवाचे असेल तर अंगी काही तरी कलागुण किंवा एखाद्या क्षेत्रात प्राविण्य मिळवणे गरजेचे असल्याचे सांगितले. चांगल्या उद्योगसमूहाला चांगल्या कर्मचाऱ्यांची नेहमीच गरज असते. त्यादृष्टीने तरुणांनी स्वतःला सिद्ध करावे असे आवाहन त्यांनी केले.

कार्यकारी संपादक सुदीप हासे यांनी वृत्तपत्राचा इतिहास सांगून, तेव्हा आणि आजचे आव्हाने आणि असणाऱ्या संधी यावर मार्गदर्शन केले. मार्केटिंग क्षेत्र विस्तारीत व अथांग आहे. फक्त आपल्याकडे बोलण्याची कला असेल तर आपण पैसे आणि प्रसिद्धी एकाचवेळी कमवू शकतो. मुक्त पत्रकार संदिप सातपते यांनी सांगितले की, आपल्यासारखा अनेक तरुणांना युवावार्ताने पत्रकारीतेत संधी दिली. तयामुळेच आज मी इलेक्ट्रॉनिक माध्यमात काम करत आहे. अंगी कला आणि कठोर परिश्रम घेतले तर या क्षेत्रात देखील करियरची मोठी संधी असल्याचे सांगितले. उपसंपादक संजय आहिरे यांनी वृत्तपत्र क्षेत्रातील अनुभव व त्याद्वारे मिळालेली संधी आणि प्रतिष्ठा यावर भाष्य केले.

दैनिक युवावार्ताचे मार्केटिंग उपसंपादक किशोर आव्हाड, सुहास सातपुते, प्रतिनिधी अजय आरणे, संकेत राजनर, सुदर्शन त्रिभुवन व सहकारी, विद्यार्थी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी प्रा. राजेंद्र गायकवाड यांनी सुत्रसंचलन केले.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड I रत्नागिरी I सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 – 224761, मोबा. 7038170382

दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
✻ कर्ज रक्कम वाढ | ✻ कर्ज व्याजदर कमी | ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड , तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25